# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

२००२।२००३

## द्वितीय वार्षिक अहवाल
## २००२-२००३

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग
# मुंबई

## द्वितीय वार्षिक अहवाल
## २००२-०३
## (एप्रिल २००२ - मार्च २००३)

एच ४१३१—१

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रकरण-१ | प्रारंभिक | १.१ |
| प्रकरण-२ | हाताळलेल्या तक्रारी | |
| | • आकडेवारी | २.१ |
| | • तक्रारींचे स्वरूप | २.१ |
| | • अटकेतील मृत्यूसंदर्भातील खटले | २.२ |
| प्रकरण-३ | कैद्यांचे हक्क : आयोगांतर्गत समिती | ३.१ |
| | • पार्श्वभूमी | ३.१ |
| | • रचना | ३.२ |
| | • संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबांचा अहवाल | ३.२ |
| | • अकस्मात दिल्या गेलेल्या भेटी आणि केलेली पहाणी | ३.२ |
| | • शिफारसी | ३.३ |
| प्रकरण-४ | मानवी हक्कांबाबतची जागरूकता आणि तिचा प्रसार | ४.१ |
| | • आयोजित चर्चासत्रे आणि कार्यशाळा | ४.१ |
| | • भेटी | ४.२ |
| | • प्रकाशने | ४.२ |
| प्रकरण-५ | कार्यालयीन कामकाज आणि व्यवस्थाविषयक पाठबळ | ५.१ |
| | • मदतनीस | ५.१ |
| | • कार्यालयाचे आवार | ५.१ |
| | • साधन | ५.१ |
| प्रकरण-६ | २००२-२००३ दरम्यान निकाल दिलेल्या खटल्यांचे स्पष्टीकरण | ६.१ |
| | जोडपत्र ‘ अ ’ | अ |

## प्रस्तावना

मानवी हक्कांना प्राधान्य देण्याकरिता आपले वैयक्तिक व स्थानिय हितसंबंध आणि बृहन सामाजिक हित यांचा समतोल साधला पाहिजे. शांततामय मानवी आयुष्यासाठी कायदा आणि न्यायव्यवस्थेला परस्परांना सहकार्य करावे लागेल. जर न्यायव्यवस्था मानवी हक्कांचे संरक्षण करू शकली नाही, तर राष्ट्र अयशस्वी ठरतं.

राष्ट्रीय व राज्य स्तरांवर मानवी हक्क आयोगांची स्थापने मागिल प्रेरणा राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दूल कलाम ह्यांच्या वरील शब्दांत प्रतिबिंबित होते.

मानवी हक्कांचे अधिक प्रकर्षाने संरक्षण करणे हा महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यामागील हेतू आहे. सन २००० मध्ये स्थापित झाल्यापासून आयोगाने हा हेतू साधण्याचा पुरेपूर प्रयत्न चालू ठेवला आहे. विद्यमान वर्षात अशा बऱ्याच घटना घडल्या आहेत व उपक्रम राबविण्यात आले आहेत, ज्यांची ह्या अहवालात आयोगाचे दुसरे यशस्वी वर्ष म्हणून नोंद होणे गरजेचे आहे.

मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत आयोगाकडे दाखल होण्याऱ्या तक्रारींत ह्या वर्षी मोठ्या प्रमाणावर वाढ झाली व त्यानुसार आयोगाच्या मध्यस्थीने निवारण झालेल्या तक्रारींच्या संख्येतही वाढ झाली.

आयोगाच्या स्थापनेमागील उद्देश आज पुर्णपणे नाही तरी हळूहळू साध्य होत आहे, असे अभिमानाने म्हणता येईल. अजून बरेच काही कार्य करायचे आहे. ही जाणीव मनात ठेवूनच हा अहवाल राज्य सरकारला सादर करण्यात येत आहे व त्यानंतर मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या कलम २८ अन्वये तो विधिमंडळासमोर शासनाद्वारे सादर करण्यात येईल.

**न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त)**
प्रभारी अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| **डॉ. व्ही. एस. चिटणीस** | **एम. आर. पाटील** | **सी. एल. थूल** |
| सदस्य | सदस्य | सदस्य |

# प्रकरण - १

## प्रारंभिक

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ पर्यंतचा हा दुसरा वार्षिक अहवाल आहे.

१.२ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना गृह खात्याच्या क्र. एचआरसी-१८९९/३७८/पोल-१४ ह्या दि. १५ जानेवारी २००० च्या शासन निर्णयानुसार झाली व दि. ६ मार्च २००१ पासून आयोगाचे कामकाज सुरू झाले.

**रचना**

१.३ ह्यावर्षी आयोगाला मिळणाऱ्या मार्गदर्शनात बदल झाला. आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती अरविंद सावंत (निवृत्त) ह्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि आयोगाचे सदस्य न्यायमूर्ती अनंत डी. माने (निवृत्त) यांनी ७ मे २००२ पासून प्रभारी अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळला. डॉ. व्ही. एस. चिटणीस आणि श्री. एम. आर. पाटील ह्यांनी आयोगाचे सदस्य म्हणून कार्य चालू ठेवले, तर २६ डिसेंबर २००२ रोजी श्री. सी. एल. थूल ह्यांची मानवी हक्क संरक्षण कायदा (१९९३) प्रकरण (२) (सी) नुसार चौथे सदस्य म्हणून नेमणूक झाली.

१.४ ह्याच वर्षी २८ ऑगस्ट २००२ रोजी आयोगाचे सचिव श्री. गोरख मेघ, (भा.प्र.से.) ह्यांच्या जागी श्री. एम. बी. रे (भा.प्र.से.) यांची नियुक्ती झाली. त्यांनी १६ जानेवारी २००३ पर्यंत कार्यभार सांभाळला व श्रीमती रंजना सिन्हा (भा.प्र.से.) यांनी १६ जानेवारी २००३ पासून आयोगाच्या सचिव पदाची सूत्रे हाती घेतली. श्री. सुभाष आवटे (भा.पो.से.) ह्यांनी पोलीस महानिरीक्षक (अन्वेषण) ह्या पदावर काम चालू ठेवले.

१.५ जून २००२ पर्यंत श्री. एम. पी. कुकडे ह्यांनी आयोगाचे प्रबंधक म्हणून कार्य केले व त्यांच्यानंतर श्री. जे. पी. संगम (पोलीस अधीक्षक) यांनी ह्या पदाचा अतिरिक्त कार्यभार वर्षाखेरपर्यंत सांभाळला.

## प्रकरण - २

## हाताळलेल्या तक्रारी

आयोगाच्या अखत्यारीतील मुख्य कामांपैकी एक काम म्हणजे स्वतःहून पुढाकार घेऊन किंवा तक्रारदाराने किंवा त्यांच्यावतीने केल्या गेलेल्या तक्रारींची चौकशी करणे. ह्या तक्रारी मानवी हक्कांचा भंग करणाऱ्या किंवा हक्कभंगाच्या संदर्भात निर्णय घेण्यात चालढकल करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या संदर्भात असतात.

**आकडेवारी**

२.२ अहवाल बनविण्याच्या कालखंडात म्हणजेच १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ मध्ये आयोगाकडे २१५३ तक्रारी आल्या. आधीच्या वर्षात हे प्रमाण १४५८ होते अर्थात तक्रारी येण्याच्या संख्येंत ५० टक्क्यांनी वाढ झाली. वर्षारंभी सुनावणीच्या प्रतिक्षेत असलेले खटले धरून २००२-२००३ ह्या वर्षात आयोगाला ३०५९ खटल्यांकडे लक्ष द्यावे लागणार होते.

२.३ ३०५९ खटल्यांपैकी १५४८ तक्रारी प्रारंभीच फेटाळण्यात आल्या, तर ९७ मुकदम्यांवर योग्य ती कारवाई करून ते संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपविले गेले. त्यामुळे त्या वर्षाखेरीस १४२४ खटले निकालाच्या प्रतिक्षेत होते. मागील वर्षी ३७.१७ % मुकदमे निकालात काढण्यात आले तर २००२-०३ मध्ये ५३.७७ टक्के खटले निर्णयात काढले गेले.

२.४ अहवालाच्या काळात १०० प्रकरणे आयोगाच्या तपास विभागाने तपासासाठी घेतली. त्यापैकी ६६ प्रकरणांची तपासणी करून आयोगाकडे त्यांचे अहवाल सादर करण्यात आले.

२.५ तक्रारींचे वाढते प्रमाण समाजातील मानवी हक्कांची जाणीव आणि महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची त्यांना असलेली माहिती ह्यांची प्रचिती देत होती. तसेच निर्णयीत काढलेल्या प्रकरणांचे प्रमाण आयोगाकडून घेतल्या गेलेल्या श्रमाची पावती होती.

२.६ या वर्षात २२ मानवी हक्कांचे उल्लंघनाबाबत आयोगाने स्वतः दखल घेतली.

**तक्रारींचे स्वरूप**

२.७ आयोगाने ९७ प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन निर्णय दिला. यापैकी ३५ तक्रारी पोलीसांविरुद्ध होत्या. पोलीसांकडून केले गेलेले कायदाबाह्य वर्तन, सतावणूक, यातना, तक्रार नोंदणी करण्यास दिलेला नकार, धमकी, शाब्दिक किंवा शारीरिक गैरव्यवहार, अर्धवट केली गेलेली चौकशी ह्याच संदर्भात होत्या. आयोगाने स्वतः दखल घेतलेल्या २२ तक्रारीपैंकी १० पोलीसांविरोधात होत्या. त्यांचे विषय छळवणूक, यातना, दुष्टकृत्य, आरोपीचा कारावासातील मृत्यू हे होते.

२.८ ९७ निकाल दिलेल्या प्रकरणांपैकी ९ तक्रारी स्त्रियांची कार्यालयात होणारी लैंगिक सतावणूक आणि स्त्रियांचा अनैतिक व्यापार या संदर्भात होत्या. पाच तक्रारी ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या निवृत्तीनंतर मिळणाऱ्या सवलती न मिळाल्यामुळे होत्या जसा, प्रोव्हिडंड फंड-प्रोव्हिडंड फंडाच्या रक्कमा मिळाल्या नाहीत आणि संजय गांधी योजनांसारख्या सरकारी योजना राबविल्या नसल्याबाबत होत्या. चार तक्रारी आदिवासींच्या आणि तीन लहान मुलासंदर्भात होत्या.

२.९ निकाल दिलेल्या ९७ खटल्यांपैकी '९' वास्तव्य हक्कांचा भंग झाल्यामुळे तर '४' उपजिविकेच्या हक्काचा भंग झाल्याने दाखल केलेल्या होत्या. आयोगाने निकाल दिलेल्या त्या खटल्यांपैकी ७ तक्रारी सरकारी योजनांपासून मिळणारे फायदे नाकारण्यात आल्याबाबत होत्या, व त्या आयोगाच्या हस्तक्षेपाने सोडविल्या गेल्या. आयोगाने लाच-लुचपतीच्या संदर्भातील दोन खटल्यांची सुनावणी केली.

२.१० आयोगाने निर्णय दिलेल्या ९७ खटल्यांपैकी १४ प्रकरणांत संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांची दखल घेऊन कारवाया केल्या. १९ प्रकरणात आयोगाने संबंधित खात्याकडे शिफारशीसह मार्गदर्शन केले. ८ प्रकरणात संबंधित खात्यांनी योग्य कारवाईची हमी दिल्याने ती बंद करण्यात आली, पण यापैकी ३ प्रकरणात अजून कार्यवाही पूर्ण झाली नाही. प्रलंबित आहेत. ६ निर्णयीत खटल्यांत असे आढळले की, तक्रारदाराने काल्पनिक प्रसंग वर्णिला असून, त्यांचा अंतस्थ हेतू प्रतिवादीची छळवणूक करणे हाच होता.

२.११ समाजाच्या व अर्जदाराप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव बाळगून आयोग प्रतिबंधक व सुधारक निर्णय देतं.

२.१२ ह्या वर्षी आयोगाने समाजदृष्टीने महत्त्वाच्या अशा तीन खटल्यांचा निर्णय दिला. एका खटल्यासंदर्भात असे आढळून आले की जेव्हा सर्वेक्षण करताना काही दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती वगळल्या गेल्या तेव्हा दारिद्र्यरेषेखालील सर्व लोकांची पहाणी करण्याची शिफारस केली. त्या पाहणी दरम्यान दुसऱ्या एका खटल्यात सरकारच्या मोफत शिक्षण योजनेअंर्तगत आदिवासी भागातील शाळांमध्ये काही मुलांना प्रवेश मिळत नव्हता, कारण त्यांच्याकडे जन्मदाखला नव्हता.

दुसऱ्या प्रसंगात आयोगाने ज्या लोकांची कायदेशीर निवासस्थाने तोडली गेली होती त्यांच्या पुनर्वसनाची शिफारस केली.

२.१३ आयोगाकडील तक्रारींच्या दखली घेतल्या गेल्यामुळे, संबंधित खात्यांनी चौदा खटल्यांमध्ये योग्यरित्या कामकाजाची सुरुवात केली. त्यापैकी एक अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्काराची नोंदणी करून घेण्यास नकार देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याच्या निलंबनाचा होता.

२.१४ आलेल्या तक्रारींची अभ्यासपूर्वक पहाणी करताना असे आढळले की, राज्यघटना आणि वैधानिक तरतुदी असूनही मानवी हक्कांचा भंग होतच आहे. त्यामुळे सरकारी योजनांबाबत जागरूकता निर्माण करणे, त्या योजना कार्यान्वित होत आहेत की नाही ह्यांच्यावर लक्ष ठेवायची गरज आहे.

## अटकेतील मृत्यूसंदर्भातील खटले

२.१५ मार्च २००१ मध्ये राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना झाल्यावर राज्यसरकारने १७ एप्रिल २००१ रोजी क्र. एचआरसी १३.२००१/संकीर्ण ४५/पोल. १४ या आदेशाने, त्या पुढील सर्व अटकेतील मृत्यूसंदर्भातील प्रकरणे उदा. - पोलीस कस्टडीतील, बालसुधारगृह, तुरुंग आणि तत्सम संस्थांतील मृत्यूसंदर्भातील प्रकरणे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे सादर करण्यावर भर दिला. त्या संदर्भात अधिकाऱ्यांना अटकेत झालेल्या मृत्यूंची माहिती आयोगाला तार करून अथवा फॅक्स करून किंवा बिनतारी संदेशाने देणे अनिवार्य आहे. त्याचबरोबर त्या प्रसंगाचा अहवाल, पंचनामा, शवविच्छेदन अहवाल याची आयोगाला माहिती देणे जरूरी केलं.

२.१६ ह्या अहवालाच्या काळात आयोगाकडे २१८ अटकेतील मृत्युचे खटले आले. २००१-०२ साली ११९ खटले आले. २१८ खटल्यांपैकी ५४ टक्के खटले राज्यातील वेगवेगळ्या तुरुंगामधल्या दोषी ठरविल्या गेलेल्या कैद्यांच्या मृत्यू संदर्भात होते. ६ टक्के पोलीस चकमकीत ठार झालेले तर ३२ टक्के संशयाखाली अटक केलेल्या कैद्यांच्या होत्या. ८ टक्के खटले भिकाऱ्यांसाठी असलेल्या सुधारगृहांतून झालेल्या मृत्यूसंदर्भात होत्या. एकूण कैदेतील मृत्यूंपैकी स्त्रिया आणि लहान मुलांच्या मृत्युच्या खटल्यांचे प्रमाण ७ % होते. आयोगात नोंदलेल्या २१८ प्रकरणात १६९ मध्ये तपास विभागांना अधिक चौकशीचे आदेश दिले गेले. कुठल्याही प्रकरणात आयोगाने दंडात्मक शिफारस केली नाही.

## प्रकरण - ३

**कैद्यांचे हक्क : आयोगांर्तगत समिती**

३.१ भारतीय संविधान - भाग तीन, भारताच्या सर्व नागरिकांच्या मूलभूत हक्कांची हमी घेते, शिवाय ज्या नागरिकांकडून कायदेभंग झाला आहे, अशांच्या मूलभूत हक्कांची देखील हमी देते.

कायदाभंग किंवा कायद्याची फसवणूक केल्याने, दोषी ठरविल्या गेलेल्या व्यक्तींच्या मूलभूत हक्कांची हमी कलम - २० द्वारा देण्यात आली आहे.

घटनेच्या तिसऱ्या भाग/खंडात नागरिकांच्या मूलभूत हक्कांची यादी उपलब्ध आहे, हे मुलभूत हक्क कायदाभंग करणाऱ्या नागरिकांनादेखील उपलब्ध आहेत.

कलम २० द्वारे कायद्याने आरोपी अथवा दोषी ठरलेल्या व्यक्तींना मूलभूत हक्क प्रदान केले आहेत.

कलम २२ अंतर्गत अटक झालेल्या व्यक्तींचे संरक्षण केले आहे. अटक होते वेळी अटकेचे कारण, कायदेशीर सल्ला अटक झाल्यापासून २४ तासांत जिल्हा दंडाधिकाऱ्यापुढे प्रस्तुत केले जाणे हे अटक होणाऱ्या व्यक्तिचे मूलभूत हक्क आहेत.

कलम २१, ह्या रचनेचा पाया म्हणून ओळखला जातो ; कारण कायद्याच्या कक्षेत राहून, ते कलम आरोपीच्या कारावासीय जिवनाची, व्यक्तीगत स्वातंत्र्याची हमी देतो. तसेच राज्य किंवा अधिकाऱ्यांकडून दिल्या जाणाऱ्या यातना आणि शारिरीक दुखापतींबद्दल हमी देतो.

३.२ तसेच कायद्याच्या कार्यपद्धतीत, व्यक्तीला अटक करताना आणि त्या व्यक्तीला तिच्या हक्कांसाठी संरक्षण देण्यासाठी तरतुदी आहेत.

(प्रकरण-४, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसीजर, १९७३)

३.३ आरोपीच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच त्यांचा भंग होऊ नये म्हणून खबरदारी घेण्यास अस्तित्वात असलेली कायदेव्यवस्था योग्य आहे. मात्र कारावासीय हिंसाचार, पोलीसांकडून दिल्या जाणाऱ्या शारिरीक, मानसिक यातना, अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकाराचा केलेला दुरूपयोग, कारावासातील मृत्यु ह्या तक्रारींचे वाढते प्रमाण यामुळे कायद्यातील कमतरता आणि विसंगती दिसून येते. त्यामुळेच योग्य अन् परिपूर्ण अशा तरतुदींची गरज निर्माण झाली.

३.४ असे दिसून आले आहे की, मानवी हक्क भंगाचे तपासणी कार्य चालू असताना, जबानी घेताना किंवा पुरावा शोधताना पोलीस कठोर उपाययोजना करतात त्यांमध्ये शारिरीक/मानसिक यातना देणे, आरोपीला अटक करूनसुद्धा त्याची नोंद न ठेवणे, किंवा त्यांच्या व्यक्तीस्वातंत्र्यात बाधा आणणे, कैद्यांना विलंबाने प्रश्न विचारणे या मार्गाचा अवलंब केला जातो.

३.५ सर्वोच्च न्यायालयाने वाढत्या तक्रारींकडे लक्ष दिले असून असे निदर्शनास आणून दिले की पोलीसांचे मुख्य कर्तव्य जनतेच्या विरोधात गुन्हे दाखल करणे नसून, तिचे रक्षण करणे हेच आहे.

मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे न्यायालयाचे मुख्य कर्तव्य असून जनतेच्या मूलभूत हक्कांचे आणि मुळ मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करणे, हे न्यायालयाचे मुख्य कर्तव्य असून, आणि नागरिकांना प्रदान केलेल्या हक्कांचा भंग करण्यास प्रतिबंध करणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या डि. के. बासू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (१९९७ : १ एससीसी ४१६) या खटल्याने अधिकाऱ्यांनी आरोपीला अटक करताना आणि एखाद्या व्यक्तीला पोलीस कोठडीत ठेवताना, अकरा गरजा पूर्ण करण्याच्या अटी घातल्या. ह्या ११ अटींना सर्वोच्च न्यायालयाने अटकेतील व्यक्तीचे अधिकार म्हणून मान्यता दिली. तसेच अटक करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हे अधिकार अबाधित रहातील ह्याची काळजी घेतली पाहिजे.

३.६ ह्या ११ गरजांची अंमलबजावणी व्यवस्थित होते की नाही ह्यावर देखरेख करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांतील मानवी हक्क आयोगांना त्यांच्याच अंर्तभूत अशा समितीची रचना करण्याची शिफारस केली. ह्या समितीला पोलीस ठाण्याना अचानक भेटी देण्याची मुभा दिली जेणे करून ११ अपेक्षांच्या अंमलबजावणीवर देखरेख करणे सूलभ होईल. ह्या पहाणींचा अहवाल ३ महिन्यांत सर्वोच्च न्यायालयापुढे सादर करणे जरूरी केले.

३.७ त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने अशा समितीची १९ डिसेंबर २००१ ला स्थापना केली. महाराष्ट्र आयोगाचे सदस्य ह्या समितीवर होते. ११ मार्च २००२ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना परिपत्रक काढून कळविण्यात आले की, अहवाल समितीकडे पाठवावेत, त्यात खालील बाबींवर लक्ष द्यावे :—

(१) ११ अपेक्षांची अंमलबजावणी होते का ? ह्याचा अहवाल तीन महिन्यांत देणे जरूरी केले.

(२) जेव्हा संबंधित खात्यांच्या प्रमुखांना त्यांच्या खात्यात सुरक्षिततेचा भंग किंवा त्यांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास, अशा घटना आणि अधिकाऱ्यांनी केलेल्या उपाययोजनांचा अहवाल ३ महिन्यांत आयोगाकडे द्यावा.

**आयोगांर्तगत समितीची रचना**

३.८ १६ जानेवारी २००३ ला झालेल्या आठव्या बैठकीत समितीचे प्रभारी अध्यक्ष न्यायमुर्ती ए.डी. माने ह्यांनी समितीची पुनर्रचना केली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एम. आर. पाटील | . . | समितीचे अध्यक्ष |
| २. | डॉ. व्हि. एस्. चिटणीस | . . | सदस्य |
| ३. | श्री. सी. एल्. थुल | . . | सदस्य |
| ४. | श्री. जे. आर. संगम | . . | चिटणीस |

**संबंधित अधिकाऱ्यांचे जबाब**

३.९ सन्माननिय सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या दिग्दर्शना बरोबरच अजून दोन प्रकारचे अहवाल समितीला आयोगाकडे सुपूर्द करायला लागतात. ते खालीलप्रमाणे आहेत :—

(१) ११ अपेक्षांची अंमलबजावणी होते का ? ह्याचा अहवाल तीन महिन्यांत आयोगाला देणे.

(२) जेव्हा संबंधित खात्यांच्या प्रमुखांना त्यांच्या खात्यात सुरक्षिततेचा भंग किंवा त्यांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास, त्या घटना आणि त्यावर केली गेलेली उपाययोजनांचा अहवाल ३ महिन्यांत आयोगाकडे देणे जरूरी आहे.

३.१० ११ मार्च २००२ रोजीचे परिपत्रक काढल्यानंतर (१) वर उल्लेखलेले पहिले अहवाल संबंधित खात्यांकडून वेळेवर मिळाले. तसेच तीन महिन्यांत द्यायचे अहवाल आयोगाला राज्यभरातील पोलीस अधिक्षकांकडून मिळाले तसेच वर उल्लेखिलेल्या हक्कभंगाची घटना घडली नाही.

**अकस्मात दिल्या गेलेल्या प्रत्यक्ष भेटी**

३.११ सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अंर्तगत समितीचे मुख्य कार्य, डी. के. बासु खटल्यांत दिल्या गेलेल्या मार्गदर्शक तत्वांचे योग्यरित्या पालन होते की नाही आणि पोलीस ठाण्यांची अकस्मात पहाणी करून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन योग्यरित्या होते की नाही ते पहाणे आहे. ह्या आदेशानुसार समितीने महाराष्ट्रातील पोलीस ठाण्यांना भेटी देऊन पहाणी केली. २००२-२००३ मध्ये ११ ठाण्यांना भेटी दिल्या, त्या दरम्यान अटक केलेल्यांची संख्या, कैद्यांची तपासणी आणि आरोपीच्या नातेवाईकांना त्यांची असलेली माहिती, ह्यांची तपासणी केली गेली. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केल्याप्रमाणे अटक पत्रावरील कैद्यांची स्वाक्षरी आणि अटक करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी ह्या गोष्टी तपासल्या.

३.१२ २००२-०३ मध्ये पहाणी केलेल्या पोलीस ठाण्यांची यादी -

| | भेटीचे दिनांक |
|---|---|
| १. मौडा पोलीस ठाणे, नागपूर | ६-५-२००२ |
| २. फ्रिझोरपूर पोलीस ठाणे, अमरावती (शहर) | ७-५-२००२ |
| ३. आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई (शहर) | १३-५-२००२ |
| ४. वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई (उपनगर) | १५-५-२००२ |
| ५. शेगाव पोलीस ठाणे, चंद्रपूर | २७-५-२००२ |
| ६. चंद्रपूर शहर पोलीस ठाणे, चंद्रपूर | २५-१-२००३ |
| ७. तोफखाना पोलीस ठाणे, अहमदनगर | २५-१-२००३ |
| ८. मुंबई गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई (शहर) | ११-२-२००३ |
| ९. बोईसर (एमआयडीसी) पोलीस ठाणे, ठाणे (ग्रामिण) | १९-३-२००३ |
| १०. डहाणू पोलीस ठाणे, ठाणे | १९-३-२००३ |
| ११. बाजारपेठ पोलीस ठाणे, कल्याण (जि. ठाणे) | ३१-३-२००३ |

पहाणी आणि शिफारसी

३.१३ पहाणी केलेल्या सर्व पोलीस ठाण्यांत असे आढळून आले की, केलेल्या अधिकृत सुचनांचे पालन होत आहे.

(I) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ११ गरजांची एक यादी सर्वांना दिसू शकेल अशा पद्धतीने पोलीस ठाण्यात लावली असून, अटकेतील इसमांची नोंदणी व्यवस्थितरित्या केली गेली आहे.

(II) काही पोलीस ठाण्यांत, अधिकाऱ्यांकडे, आरोपीच्या नातेवाईकांना त्यांची माहिती दिल्याचा पुरावा मागितला असता, अधिकारी तसा पुरावा समितीला देऊ शकले नसल्याने समितीने अधिकाऱ्यांना अशा व्यवहाराची कागदोपत्री नोंद करण्याचे सुचित केले. ज्या नातेवाईकाला कळविण्यात आले, त्याच्या स्वाक्षरीची नोंद केली जावी.

(III) काही ठाण्यांत सूचना फलक ठळकपणे दिसत नव्हता, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना सूचनाफलक नजरेत येईल अशापद्धतीने लावायला सांगितला.

(IV) पोलीस अधिकारी त्यांचे नाव त्यांच्या हुद्याबरोबर लावत होते.

३.१४ समितीने केलेल्या शिफारसी, भेटी दरम्यान संबंधित पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांकडे करण्यात आल्या. समितीकडे संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षकांकडून अकरा अपेक्षांच्या आदेशाच्या देखरेखीचे तिमाही अहवाल येऊ लागले.

# प्रकरण - ४

## मानवी हक्कांची जागरुकता व प्रचार

मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३, कलम १२ (एच) द्वारा मानवी हक्कांबाबतची माहिती आणि त्यांचा प्रसार समाजाच्या वेगवेगळ्या थरांतून करून, प्रकाशन, चर्चासत्रे, प्रसार माध्यम इत्यादींचा वापर करून जागरुकता निर्माण करणे आयोगाला अनिवार्य केले आहे.

४.२ मानवी हक्काचे ज्ञान समाजात बिंबवून, त्याबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करून, जबाबदार कारभाराची समाज उन्नतीसाठी गरज आहे. मानवी हक्कांची माहिती सर्वापर्यंत पोहचविणे हिच समाजोन्नतीची मुख्य गरज असल्याचे ओळखून आयोगाने अनेक मानवी हक्क अभियानांना चालना दिली जेणे करून समाजातील अनेक वादग्रस्त मुद्द्यांना हात घातला जाईल आणि समाजात मानवी हक्कांची जागरुकता निर्माण होईल.

## चर्चासत्रे आणि कार्यशाळा

४.३.१ २००२-०३ च्या दरम्यान आयोगाने ९ फेब्रुवारी २००३ रोजी " हक्कांचे संरक्षक " या विषयावर चर्चासत्र आयोजित केले. ह्या चर्चासत्रात आयोगाच्या जोडीने " क्रिमिनॉलॉजी करेक्शन ॲडमिनीस्ट्रेशन, टाटा सामाजिक संस्था, मुंबई व इंडिया सेंटर फॉर ह्यूमन राईटस् ॲण्ड लॉ ", मुंबई यांच्या सहभागाने आयोजित केला गेला. चर्चासत्र आयोजित करण्याचा हेतू, "पोलीसांचे मानवी हक्कांचे संरक्षण आणि त्यांचा प्रसार करण्यामागे काय भूमिका असावी ह्या मुद्यांला व्यासपीठ मिळवून देणे हा होता. पोलीसांद्वारे कारवाई होत असताना मानवी हक्कांचे महत्त्व व ते अंमलात आणताना येणाऱ्या अडचणींची येथे चर्चा करण्यात आली. ह्या चर्चासत्रात प्रामुख्याने पोलीस अधिक्षक, 'मानवी हक्क' कार्यकर्ते आणि या विषयातील जाणकार व्यक्तींनी भाग घेतला.

४.३.२ श्री. पी. एम्. बनसोडे, चीफ मेट्रोपोलीटन मॅजिस्ट्रेट, हे चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे होते. श्री. सुभाष आवटे, स्पेशल इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, प्रा. आर. आर. सिंग, डायरेक्टर, डिपार्टमेंट ऑफ क्रिमिनॉलोजी ॲण्ड करेक्शनल ॲडमिनिस्ट्रेशन, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई आणि ॲडव्होकेट मिहीर देसाई, माननीय डायरेक्टर इंडिया सेंटर फॉर ह्युमन राईटस् ॲण्ड लॉ यांनी चर्चासत्रात व्याख्यान दिले.

४.४ १० डिसेंबर २००२ रोजी आयोगाकडून "मानवी हक्क' दिनाचे पालन करण्यात आले. ह्या प्रसंगी बोलताना प्रभारी अध्यक्ष न्यायमुर्ती, ए. डी. माने (निवृत्त) यांनी १९४८ च्या जागतिक मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याचे महत्त्व विशद करून सांगितले. तसेच इतर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नियम विशद केले. त्यांनी सांगितले कि, " मानवी हक्क दिवस " हि आपली जागतिक मानवी हक्क जाहीरनाम्याप्रती असलेली जबाबदारी दर्शविण्यास मिळालेली सुसंधी आहे.

४.५ आयोगाने मानवी हक्कांचा प्रसार आणि त्यासंबंधी चर्चासत्रे, कार्यशाळा, सभा इत्यादी मध्ये भाग घेण्याचा उपक्रम चालू केला. मानवी हक्क या संदर्भात आयोजित केलेल्या १९ चर्चा सत्रांत व सभांमध्ये आयोगाच्या सदस्यांनी ह्या वर्षी भाग घेतला.

४.६ आंबेडकर विद्यालयाने एन् . एस्. एस्. च्या सहयोगाने आयोजित केल्या गेलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी न्यायमुर्ती, ए. डी. माने (निवृत्त) यांनी मानवी हक्क आयोगाचे आणि अशासकीय संस्थांचे (NGO) एकत्रित प्रयत्नांच्या गरजेवर भर दिला. सरकारी अधिकाऱ्यांच्या " मानवी हक्क कायदा, १९९३ " ह्या विषयावर आयोजित केल्या गेलेल्या एका स्थानिक सभेचा नामनिर्देश करून त्यांनी " मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ " चा विस्तार सांगून, ह्या कायद्याला त्यांनी " समाजाच्या फायद्याचे उपकरण " असे संबोधले.

४.७ आयोगाचे सदस्य डॉ. व्ही. एस्. चिटणीस यांनी " दहशतवाद, टोळीवाद आणि मानवी हक्क, मानवी दहशतवाद, दहशतवाद आणि संघटीत गुन्हे " यांसारख्या चर्चासत्रांत हिस्सा घेतला. मार्च, २००३ मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त, " जेन्डर जस्टिस " या विषयावर भाषण देताना ते म्हणाले की, गरीबी, शोषण, आणि समाजाला पोहचणारी हानी ह्यांचे कारण स्त्री-पुरुष भेदभाव आणि धार्मिक भेदभाव, हे आहेत.

४.८ आयोगाचे सदस्य श्री. एम्. आर. पाटील. यांनी खालील कार्यक्रमात उपस्थिती दर्शविली ; नागपूर येथे आयोजित केलेल्या जिल्हा न्यायाधिश व पोलीस निरीक्षकांची सभा, अमरावती येथे आयोजित केलेली तहसिलदार व नायब तहसिलदार यांचा अमरावती येथील महाराष्ट्र राज्य सरकारच्या विभागीय शैक्षणिक संस्थेच्या भरती नंतरच्या शैक्षणिक कार्यक्रमात, तसेच अमरावती येथील पोलीस आयुक्त यांनी आयोजित केलेली कार्यशाळा, एस्. पी. विधी महाविद्यालय व महिला विकास मंडळ, चंद्रपूर यांनी आयोजिलेल्या (बालगुन्हेगारी न्याय) जूवेनाईल जस्टिस " (बालकांची काळजी आणि संरक्षण) कायदा, २००० आणि परित्याग केलेली

अथवा अनाथ बालके " या कार्यशाला तसेच सभांमध्ये व्याख्यान दिले. तसेच नागपूर मध्ये जागतिक महिला संघाने मानवी हक्क याच विषयावर " शांतता आणि स्वातंत्र्य " ह्या संबंधात चर्चासत्र आयोजित केले, त्यात व्याख्यान दिले. श्री. एम्. आर. पाटील यांनी प्रतिपादन केले की, जनसामान्यांत मानवी हक्कांबाबतची जागरूकता मानवी हक्क भंग पूर्णपणे संपवू शकेल किंवा त्यांचे प्रमाण कमी करेल.

४.९ २००२-०३ मध्ये सदस्य श्री. सी. एल्. थुल यांनी पाच चर्चासत्रे आणि कार्यशाळांत व्याख्यान दिले.

**भेटी**

४.१० २००२-०३ साली आयोगाने अनेक पोलीस ठाण्यांना आणि तुरुंगांना भेटी दिल्या. ऑर्थर रोड तुरुंग (मुंबई), येरवडा तुरुंग (पुणे), डिस्ट्रिक्ट जेल (अहमदनगर) आणि मध्यवर्ती कारागृह (ठाणे) येथे आयोगाचे सदस्य डॉ. व्हि. एस्. चिटणीस यांनी भेटी दिल्या. या भेटीदरम्यान त्यांनी तेथील संबंधित अधिकाऱ्यांना वैद्यकीय सेवा सुधारण्यासाठी आणि मुकादम्यांचे शक्य तितक्या लवकर आणि परिणामकारकरित्या तपासकाम करण्यासाठी सूचना दिल्या. अहमदनगर आणि ठाणे येथील पोलीस ठाण्यांना दिलेल्या भेटींदरम्यान डॉ. व्हि. एस्. चिटणीसांनी डि. के. बासू खटल्यादरम्यान सर्वोच्च न्यायालयाने आदेशित केलेल्या अकरा अपेक्षांच्या पूर्तीवर भर दिला.

४.११ सदस्य श्री. एम्. आर. पाटील यांनी मौडा नागपुर, फ्रिझोरपुरा - अमरावती, आझाद मैदान - मुंबई, बांद्रा - मुंबई, शेगांव - बुलढाणा, चंद्रपूर, मुंबई क्राईम ब्रांच - मुंबई, बोईसर (एमआयडिसी) ठाणे (ग्रामिण) ह्या पोलीस ठाण्यांना भेटी दिल्या असताना असे आढळले की सर्वोच्च न्यायालयाने अटकेतील व्यक्तीला जे अधिकार दिले आहेत त्यांची माहिती किंवा यादी ठाण्यात तयार केली जात नाही.

४.१२ सदस्य श्री. सी. एल. थुल यांनी २ कारागृह आणि २ पोलीस ठाण्यांना भेटी दिल्या.

**प्रकाशन**

४.१३ २००२-०३ च्या दरम्यान आयोगाने स्वतःच्या पुस्तकांचे प्रकाशन केले. त्या प्रकाशनांची रूपरेषा थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :—

**१. फॅक्ट फोल्डर**

ह्यात सहा पत्रकांचा समावेश होतो.

- स्वागत पत्रिका - ह्यात मानवी हक्क कायदा - १९९३ च्या अंतर्गत मानवी हक्कांची ओळख करून दिली.
- तुमच्या मानवी हक्क आयोगाची ओळख - ह्यात महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची माहिती दिलेली होती.
- आम्ही तक्रारींचे निवारण कसे करतो - ह्यामध्ये मानवी हक्क संरक्षण कायद्यांतील योग्य भाग दिले होते.
- मानवाधिकारांची सार्वभौम घोषणा, १९४८ (मराठी) ह्यात जागतिक मानवी हक्क जाहीरनाम्याचा १९४८ चा उल्लेख होता.
- मानवी हक्क आणि राज्यघटना - राज्यघटना आणि मानवी हक्कांचे नाते विशद केलेले होते.
- तुरुंगातील कायदेव्यवस्था - कैद्यांना असलेल्या अधिकारांचा उल्लेख होता.

**२. मानवी हक्क - न संपणारी लढाई**

ह्या पुस्तकात जागतिक मानवी हक्क कायदा भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाने मानवी हक्कांच्या संदर्भात दिलेले निकाल यांचे प्रमाण, आणि नियम यांचे महत्त्व विशद केले. तसेच मानवी हक्कांचे अर्थ, स्वरूप आणि त्यांचा विस्तार सुद्धा सांगितला.

**३. मानवी हक्क कायदा - १९९३ " सामाजिक उपयोगितेचे उपकरण "**

ह्या पुस्तकात मानवी हक्क कायदा, १९९३ समजावून सांगितले आहेत. ह्या कायद्याला पुर्णपणे सरकारविरोधी अधिकार मानायला प्रतिकार करून, ह्याच्याकडे समाजाबरोबर एक नवे आणि कळकळीचे नाते सुस्थापित करायची संधी समजून पाहिले आहे.

**४. मानवी हक्क आणि प्रगती**

ह्या पुस्तकात सर्वांगिण विकास, मानवी हक्कांचा एक हिस्सा आहे असे प्रतिपादीत केले आहे, आणि पुस्तकाच्या नावावरून सुद्धा हेच सूचित केले. मानवी विकासाबरोबरच, मानवी हक्कांचा साचा, " क्योटो " जाहीरनामा ज्यामध्ये एका ठराविक प्रमाणात होणारा विकास, गरिबी, स्त्रिया, परिस्थिती, राज्यकारभार ह्या विषयांना हे पुस्तक वाहिले होते.

## प्रकरण - ५

### कार्यालयीन कामकाज आणि व्यवस्थाविषयक पाठबळ

महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्रमांक एचआरसी-१०९९/३७८/पोल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० द्वारे राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना झाली. दि. १२ मार्च २००१ पासून न्यायमूर्ती अरविंद व्ही. सावंत यांनी पहिले अध्यक्ष म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर आयोगाचे प्रत्यक्ष कामकाज सुरू झाले. २००१-०२ च्या अहवालात नमुद केल्याप्रमाणे न्यायमूर्ती श्री.अरविंद सावंत यांनी राजीनामा दिल्यानंतर न्यायमूर्ती अनंत डी. माने (निवृत) यांनी दि. ७ मे २००२ पासून प्रभारी अध्यक्ष म्हणून सूत्रे हाती घेतली आहेत. डॉ. व्हि. एस्. चिटणीस आणि श्री. एम्. आर. पाटील ह्यांनी आयोगाचे सदस्य म्हणून आपले कार्य सुरू ठेवले. दि. २६ डिसेंबर २००२ रोजी श्री. सी. एल. थूल यांनी आयोगाचे चौथे सदस्य म्हणून सूत्रे हाती घेतली. अध्यक्षपद मात्र रिकामेच होते.

### अधिकारी व कर्मचारी वर्ग

५.२ आयोगाचे अधिकारी व कर्मचारी यांचा तीन विभागांत वाटप करण्यात आले. प्रशासकीय विभाग, सचिवांच्या अधिपत्याखाली, अन्वेषण विभाग, विशेष पोलीस महानिरिक्षक यांच्या अधिपत्याखाली व प्रबंधक यांच्या अधिपत्याखाली विधी विभाग.

५.३ २००२-२००३ मध्ये आयोगाचे सचिव, श्री. गोरख मेघ (भा.प्र.से.) यांची बदली झाल्यामुळे दि. २८ ऑगस्ट २००२ पासून श्री. एम्. बी. रे (भा.प्र.से.) यांनी सचिव पदाची सूत्रे हाती घेतली. तसेच दि. १६ जानेवारी २००३ पासून श्रीमती रंजना सिन्हा (भा.प्र.से.) यांनी सचिव पदाचा कार्यभार सांभाळला. श्री. सुभाष अवटे (भा.पो.से.) ह्यांनी पोलीस महानिरिक्षक (अन्वेषण) हे पद सांभाळले. श्री. एम.पी. कुकडे, प्रबंधक म्हणून दि. १७ जुलै २००२ पर्यंत कार्यरत होते व त्यानंतर श्री. जे. आर. संगम (पोलीस अधीक्षक) यांनी वर्षअखेरपर्यंत प्रबंधक पदाचाअतिरिक्त कार्यभार सांभाळला.

५.४ अध्यक्ष व चार सदस्य ही पदे सोडून मान्यता प्राप्त पदे ४३ होती. २००२-०३ च्या दरम्यान एकही नवे पद निर्माण केले नाही. २००२-०३ दरम्यान एक विधी सहायक व चार पोलीस शिपाई यांची नियुक्ती झाल्यामुळे ४३ पैकी ४० पदे भरली.

### आयोगाचे कार्यालय

५.५ दि. १५ जानेवारी २००० च्या शासन निर्णय क्रमांक एचआरसी १०९९/३७८/पोल-१४, नुसार महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाचे मुख्य कार्यालय मुंबईतच असावे असे सुचित केले. त्यानुसार शासनाने आयोगास कार्यालयासाठी खालील जागा सुचविल्या. त्यापैकी मंत्रालयाच्या समोरील नवीन प्रसाकीय इमारत, गोव्हर्नमेंट ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस, वरळी, अरुण चेंबर्स, ताडदेव, नवीन प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), जुने कस्टम हाऊस, मुंबई. तरी आयोग योग्य जागेच्या शोधात होते. शेवटी सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक जीए/११-०१/जीएन-१५/२००१/२२ अन्वये, २० जून २००२ रोजी शासनाने आयोगाला स्टाफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कॉलेज बिल्डिंग कंपाउंड, ९, हजारीमल सोमाणी मार्ग, सी. एस. टी. स्टेशनसमोर, मुंबई येथे २३८० चौ. फुट जागा दिली. (ही जागा आधी राज्य वित्त आयोगाकडे होती.)

५.६ प्रथमतः आयोगाला एकूण ९ खोल्यांचा ताबा मिळाला. शासन आदेश क्रमांक जीए/११.०१/सीएन १५/२००१/२२ ; ३१ ऑगस्ट २००२ अन्वये आणखी दोन खोल्या ताब्यात मिळाल्या. शासन परिपत्रक क्रमांक जीए ११.०१/सीएन १५/२००१/२२ नुसार २१ जानेवारी २००३ रोजी आणखी चार खोल्या आयोगाने ताब्यात घेतल्या. आतापर्यंत आयोगाकडे २९०० चौ.फुट इतकी जागा आहे.

### साधनसंपत्ती

५.७ २००१-०२ दरम्यान आयोगाला शासनातर्फे रु. ३१.४६ लाख अनुदान मिळाले, तर आयोगाचा रु. ५८.८२ लाख इतका एकूण खर्च झाला. २००२-०३ दरम्यान आयोगाला प्रथम रु. ९६.५ लाख आणि नंतर रु. ४.८१ लाख म्हणजेच एकूण रु. १०१.४० लाख अनुदान मिळाले. रु. ९०.५२ लाख खर्च झाले. त्यापैकी रु. ६४.३९ लाख वेतन व सवलतींवर खर्च झाले.

५.८ वर्षअखेरीस शासन निर्णय क्र. एचआरसी-१३२००१/संकीर्ण-१४८/पोल-१४ अन्वये गृहखात्याकडून २९ मार्च २००३ रोजी आयोगाला जुन्या इमारतीचे नुतनीकरण व नवीन इमारतीच्या बांधकामासाठी रु. ६५.०७ लाख अनुदान मिळाले.

## प्रकरण - ६

### निकाल दिलेल्या खटल्यांचे स्पष्टीकरण

२००२-०३ मधील मुकदम्यांचे एकत्रीत करण्यासाठी त्यांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे :—

(१) अटक आणि कैद

(२) आकलन

(३) दुष्टकृत्य

(४) पोलीसांकडून केली गेलेली मारहाण

(५) सरकारी योजनांपासून मिळणाऱ्या फायद्यांचे हक्क

(६) लाचलुचपत

(७) बांधकामाची तोडणी/घरे पाडणे

(८) पोलीसांद्वारे तक्रार नोंदविण्यास नकार

(९) समान कामासाठी समान वेतन

(१०) अनैतिक व्यापार

(११) लोकसेवकांची अकार्यक्षमता

(१२) छळवणूक

(१३) असहकार

(१४) ध्वनी प्रदुषण

(१५) त्रास

(१६) निवृतीनंतरचे फायदे

(१७) शिक्षणाचा हक्क

(१८) समानतेचा हक्क

(१९) उपजिवीकेचा हक्क

(२०) Right of Press/वृत्तपत्रांचे हक्क

(२१) अपंगाचा हक्क

(२२) धमकी

### अटक आणि कैद

(१) तक्रार क्र. : ८३५/२००१

तक्रारीची तारीख : २९ आक्टोबर २००१

तक्रारदार : श्री. मुनाफ बारमारे

प्रतिवादी : पोलीस आयुक्त मुंबई

सदस्यांचे नाव : न्यायमुर्ती ए. डी. माने (निवृत्त)

**तक्रारीचे स्वरूप**— तक्रारदाराने सांगितलेली वस्तुस्थिती अशी आहे की, पोलीस अधिकाऱ्यानी जेव्हा तक्रारदारावर हमला होऊन तो जखमी झाला होता, ज्या मध्ये श्री. एम. एन . सिंग आणि समाजातील काही लोक सामिल होते, तेव्हा पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर केला. तक्रारदाराच्या मते, पोलीसांनी अपराध्याला पकडले नाही.

**आयोगाने केलेली कार्यवाही**— आयोगाने मुंबईच्या पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागविला आणि नंतर सुनावणीसाठी बोलविले त्याप्रमाणे पोलीस उप आयुक्तांकडून २२ जानेवारी २००२ रोजी आलेल्या अहवालात सांगितले होते कि तक्रारदार हॉस्पिटलमध्ये असताना त्याचे जबाब पाच वेळा घेतले होते, जेव्हा त्याने उत्तर देण्यास नकार दिला होता व नंतर त्यांने असे नमुद केले कि त्याला काही रहिवाश्यांनी मारले होते. त्यांच्या शेजाऱ्यांनेही नमुद केले की तक्रारदार लिफ्टच्या दरवाज्याजवळ पडला होता त्यामुळे असा निष्कर्ष काढला गेला कि तक्रारदाराने फक्त पोलीस आणि समाजातील काही लोकांना त्रास द्यायच्या हेतुनेच तक्रार केली.

**निर्णयाची तारीख**— २७ मार्च २००३.

**आयोगाचा निर्णय**— निर्णय देताना आयोगाने दोन मुद्दे लक्षात घेतले (१) दोषी व्यक्तींना अटक न करणे हा दखलपात्र गुन्हा ठरून तो मानवी हक्कांचा भंग ठरू शकतो का ? (२) खटला मानवी हक्क कायद्याच्या तरतूद भाग १२ (अ) च्या अमलात येतो का ?

आयोगाने लक्षात घेतले की, अटक करणे म्हणजे व्यक्तीस्वातंत्र्यावर बंधन घातले जाणे असून, पोलीस अधिकारी अटकेचा योग्य निर्णय घेण्यास कार्यक्षम आहेत. त्यामुळे ह्या प्रकरणात दोषी व्यक्तींना अटक न करणे मानवी हक्क कायदा भंग करत नसुन, अधिकाराचा गैरवापर ह्यात सुचित होत नाही. त्यामुळे आयोगाने घेतलेल्या निर्णयात असे सांगण्यात आले, की ही तक्रार कायद्याच्या तरतुदीतील भाग १२ (अ) त योग्यरित्या बसत नसल्याने तो खटला बंद करण्यात आला.

| | | | |
|---|---|---|---|
| (२) | तक्रार क्र. | : | ५०३/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १६ ऑगस्ट २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. भास्कर महादेवराव बोंडे |
| | प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, पुणे |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप**— मराठी वर्तमानपत्र महाराष्ट्र टाईम्स च्या २९ जून २००१ च्या अंकात 'अनुभव' नावाचे जे सदर लिहीले जाते, त्यात दोन लहान मतीमंद मुलांना कायदाबाह्य अटक करून त्यांना झालेल्या मारहाणीचा उल्लेख केला होता; आणि ही हकिकत तक्रारदाराने आयोगाच्या निदर्शनास आणली.

**आयोगाकडून केली गेलेली कारवाई**— आयोगाने पुण्याच्या पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागविला. १८ एप्रिल २००२ च्या त्या अहवालात असे नमुद केले होते की पोलीसांनी अशा कुठल्याही मुलांना पकडून मारहाण केलेली नाही. पण संशयास्पद परिस्थितीत ती मुले सापडल्याने पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन, पोलीस चौकीला लागून असलेल्या खोलीत ठेवले पण लेखकाने त्यांचा ताबा मागितल्यावर त्यांना लगेच मुक्त करण्यात आले.

पुढे अहवालाच्या आधारावर आणि लेखिकेने १५ ऑक्टोबर २००१ रोजी सहायक पोलीस आयुक्त, पुणे यांना लिहिलेल्या पत्रावरून असे आढळून आले की तो प्रसंग १९९० मध्ये घडला असून, तिने तो लेख पुढील परिणामांचा विचार न करता अतिशयोक्तीपूर्ण रीतीने लिहीला होता.

**आयोगाचा निर्णय**— लेखिकेने वर्णिलेला प्रसंग अतिशयोक्तीने लिहीला असून तो खून आधीच घडला आहे ह्यावर विश्वास बसल्याने आयोगाने ठरविले की ह्या खटल्यासाठी पुढील तपासणीची गरज नाही. त्यामुळे तक्रारदाराच्या (ज्याने मानवी हक्कभंगाची तक्रार केलेली त्याच्या) प्रति कृतज्ञता व्यक्त करून खटला बंद करण्यात आला.

| | | | |
|---|---|---|---|
| (३) | तक्रार क्रमांक | : | ११४०/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १८ डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | अब्दूल छोटाभाई शेख |
| | प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, ठाणे |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप**— तक्रारदाराने श्री. शिंदे (पोलीस उप निरिक्षक), अँटी-एक्सटॉरेशन सेल, गुन्हे शाखा, ठाणे यांच्या विरोधात त्यांची छळवणूक करून, बेकायदेशीरपणे तुरुंगात टाकल्याची तक्रार नोंदवली. अब्दूल शेख पोलीसांचा खबऱ्या असून ७-८ वर्षांपुर्वी त्यांनी पोलीसांना एका गुंडाला पकडायला मदत केली होती.

पोलीस उप निरिक्षकाने अब्दूल यांना त्या गुंडाला दोन दिवसांत ताब्यात आणून द्यायला सांगितले, जेव्हा तक्रारदाराने तसे करण्यात असमर्थता दर्शविली तेव्हा पोलीस उप निरिक्षकांने त्यांना बेकायदेशीरपणे अटक केली. तसेच अब्दूल शेख यांना खोट्या पोलिसी चकमकीत ठार मारून टाकू अशी पोलीस उप निरिक्षकाकडून धमकी दिली.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पोलीस आयुक्त, ठाणे यांच्याकडून अहवाल मागवून नंतर त्यांना सुनावणीसाठी बोलावले. १६ ऑगस्ट २००२ ला आयोगाकडे सूपूर्द केलेल्या अहवालात सांगितले की, तक्रारदाराने त्यांच्याच टोळीतील सदस्यांनी दिलेल्या तणावामुळे तक्रार नोंदवली होती. पोलीस उप निरिक्षकांनी फक्त चौकशीसाठी बोलावले होते. श्री. शिंदेनी (पोलीस उप निरिक्षक) शपथेवर दिलेल्या जबानीत सांगितले कि, त्यांनी तक्रारदाराकडून माहिती काढण्यासाठीच बोलावले होते कारण तो पोलीसांचा खबऱ्या म्हणून काम करत होता. पण छळवणूक आणि बेकायदेशीर अटकेची तक्रार मात्र खोटी आहे.

आयोगाला तक्रारदाराकडून एक विनंतीपत्र आले, ज्याच्यात त्यांनी तक्रार मागे घेण्याची इच्छा व्यक्त केली होती कारण त्यांनी आयोगाकडे जी तक्रार केली ती त्यांच्या आणि पोलीस उप निरिक्षकामधील गैरसमजूतीतून केली, तसेच ती इंग्रजी भाषेतून लिहीली गेल्यामुळे त्यांना तिच्यातील अर्थ कळले नाही.

**आयोगाच्या निर्णयाची तारीख—** २८ नोव्हेंबर २००२

**निर्णय—** तो खटला बंद करण्यात आला कारण अहवालावरून आणि विनंती पत्रावरून आयोगाने निष्कर्ष काढला की, पुढील चौकशींची गरज नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| (४) | तक्रार क्रमांक | : | ११०५/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | ६ जून २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. सुनिल वाटे |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, गोंदीया. |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस्. चिटणीस |

**तक्रारीचे स्वरूप—** असिस्टंट सब इन्स्पेक्टर वायरलेस मॅसेज डिपार्टमेंट हे तक्रारदार होते. रायपूर (छतीसगढ) हून पाच पोलीस ज्यांच्यात दोन महिला हवालदारांचा समावेश होता, आणि तक्रारदाराचे सासरे यांनी त्यांना आणि त्यांच्या आईला जबरदस्तीने महालक्ष्मी लॉज, गोंदीया मध्ये पकडून त्यांचा छळ केला. तसेच त्यांनी श्री. वाटेंना त्यांच्या खात्यातील लोकांशी संपर्क साधू दिला नाही ; तसेच त्यांचे घरगुती सामान जप्त केले. ह्या त्रासामुळे तक्रारदाराच्या आईंना महिला इस्पितळात दाखल करावे लागले. तक्रारीत त्यांनी लिहीले होते की, त्यांनी विनंती करूनसुद्धा त्यांची पत्नी तिच्या आई-वडीलांकडून परत येत नव्हती आणि तिने सेक्शन ४९८-अ/३४ भा.दं.वि. खाली त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाविरुद्ध खोटी तक्रार दाखल केली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने गोंदीया पोलीस अधीक्षकांकडून अहवाल मागितला; त्या अहवालात असे म्हटले होते कि, तक्रारदाराच्या पत्नीने त्याच्या आणि सासरच्या लोकांविरोधात सेक्शन ४९८-अ शारीरिक आणि मानसिक छळाची तक्रार रायपूर पोलीस ठाण्यात (छतिसगड) मध्ये नोंदवली होती. त्यामुळे पोलीस अधीक्षकांच्या आज्ञेनुसार (रायपूर) दोन महिला हवालदारांसह पोलीस चौकशीसाठी गोंदीयाला आले. त्यादरम्यान त्यांनी त्यांच्या आईला ताब्यात घेतले आणि म्हणूनच तक्रारदाराला त्यांनी बरोबर घेतले. ह्या चौकशीत त्यांनी गोंदीया आणि गडचिरोलीच्या पोलीसांची मदत घेतली. तसेच असे विधान केले गेले की महालक्ष्मी लॉज मधील वाईट व्यवहार आणि बेकायदेशीर अटक खोटी आहे.

पुढे आयोगाला २४ फेब्रुवारी २००३ रोजी तक्रारदाराच्या सहीचे विनंतीपत्र मिळाले तसेच ते पत्र गोंदीयाच्या पोलीस अधीक्षकांना पाठविले होते; ज्यामध्ये त्यांनी आयोगाने केलेल्या कारवाईबद्दल समाधान व्यक्त केले होतेच शिवाय त्यांनी त्यांच्या तक्रारीबाबत आयोगाकडून पुढे कुठलीही कारवाई करण्यात येऊ नये अशी विनंती केली होती. त्या पत्रात असेही नमुद केले की, सध्या ती तक्रार न्यायालयात दाखल केली असून तक्रारदारांना न्यायालयाचा निर्णय मान्य असेल.

**निर्णयाची तारीख—** ६ मार्च २००३

**निर्णय—** तक्रारदाराचे विनंतीपत्र लक्षात घेऊन, आयोगाने तो खटला बंद केला.

**एप्रिहेन्शन (अटक)**

| | | | |
|---|---|---|---|
| (५) | तक्रार क्रमांक | : | २५५/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | १ फेब्रुवारी २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. सतीष सी. वाळके |
| | प्रतिवादी | : | आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस्. चिटणीस |

**तक्रारीचे स्वरूप—** इन्ड इंटरटेन्मेंट प्रा. लि., इन केबलचे वितरक हे तक्रारदार असून त्यांच्या मते त्यांना चुकीने (टाडा)TADA खाली गुन्हेगारी खटल्यांमध्ये गुंतविले असून, न्यायालयानेसुद्धा त्याला मान्यता दिली. गेल्या दोन महिन्यांपासून त्यांच्या जिवीताला पोलीसांकडून धोका उद्भवत असून, त्यांना संशय आहे की त्यांना खोट्या गुन्हेगारी मुकदम्यात किंवा पोलिसी चकमकीत गुंतविण्यात येईल.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** तक्रारीचे गांभिर्य ओळखून आयोगाने तक्रार "अन्वेषण विभागाकडे देण्याचे ठरविले. २० जून २००२ रोजी विशेष पोलीस महानिरिक्षक (अन्वेषण) आणि १७ जून २००२ रोजी वरिष्ठ पोलीस अधिकारी, आग्रीपाडा पोलीस ठाणे यांच्याकडून अहवाल आयोगाला मिळाला ज्यामध्ये नमुद केले की तक्रारदार गुन्हेगार असून, छोटा राजन टोळीशी त्याचे संबंध होते. त्यामुळे स्थानिक पोलीसांची त्याच्यावर नजर होती आणि तसेच तो नसताना त्याच्या घरातील लोकांवर पुढे अन्वेषण विभागाकडून मिळालेल्या अहवालात असे नमुद केले होते की, तक्रारदाराला आपल्या आयुष्याला असलेल्या धोक्याची भीती होती. पण त्याच्या ह्या भीतीला पुरेसा पुरावा/आधार नव्हता.

**निर्णयाची तारीख—** ७ जुलै २००२.

**निर्णय—** अन्वेषण विभागाच्या अहवालानुसार स्पष्ट झाले की, आयोगाला ह्या प्रसंगात कुठेही हरकत घेता येणार नाही. त्यामुळे खटला बंद करण्यात आला.

| | | | |
|---|---|---|---|
| (६) | तक्रार क्रमांक | : | १३६१/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २ जुलै २००२ |
| | तक्रारदार | : | अब्दूल रझाक मोहम्मद इस्माईल |
| | प्रतिवादी | : | पोलीस उप आयुक्त, नवी मुंबई |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस्. चिटणीस |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराच्या दोन मुलांना खोट्या कारणांसाठी पकडले होते. त्यापैकी एका मुलाला बेलवर सोडविले असून, दुसरा पोलीसांच्या ताब्यात होता. २९ जून २००२, पोलीस उप निरिक्षक श्री. कोल्हटकरांनी तक्रारदाराला फोन करून कार्यालय, ब्लॉक धरून चारही चाव्या पाठविण्यास सांगितल्या; आणि धमकी दिली कि चाव्या न पाठविल्यास, पोलीसांच्या ताब्यातील मुलाला त्याचे परिणाम भोगावे लागतील. त्यामुळे तक्रारदारांनी घरातील नोकर, युनुसकडे चाव्या देऊन त्याला पाठविले. श्री कोल्हटकरांना अनेकदा फोन करूनही मध्यरात्रीपर्यंत युनूस परतला नाही ; त्यामुळे त्यांनी ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात तशी लेखी तक्रार नोंदवली.

**आयोगाची कारवाई—** आयोगाने मुंबई पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागविला. २१ मार्च २००३ च्या अहवालात नमुद केले की, श्री. कोल्हटकरांनी घरी फोन करून चाव्या मागविल्या त्याचे कारण फक्त तेथे तपास करायचा होता, म्हणूनच आणि ते तपासकाम श्री. यूनुस यांच्या उपस्थितीत केले गेले. तसेच कोल्हटकर (पोलीस उप निरिक्षक) आणि इतरांकडून केल्या गेलेल्या तपासकामात कुठलाही वाईट हेतू नव्हता.

**निर्णयाची तारीख—** २५ मार्च २००३

**निर्णय—** हे प्रकरण बंद करण्यात आले कारण डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस यांच्या अहवालावरून असे दिसून आले की कोल्हटकरांनी फक्त तपासासाठीच शोध घेतला आणि तेव्हा तक्रारदाराचा प्रतिनिधीसुद्धा तेथे हजर होता.



(शा.म.मु.) एच ४१३१—६ (१,२००—९-०५)

**दृष्टकृत्य/मारहाण**

(७) तक्रार क्र. : ८०१/२००२
तक्रारीची तारीख : १५ एप्रिल २००२.
तक्रारदार : श्री. पारसनाथ तिवारी
प्रतिवादी : पोलीस उप आयुक्त
सदस्यांचे नाव : डॉ. व्ही. एस्. चिटणीस

**तक्रारीचे स्वरूप—** नॅशनल काँग्रेसचे विभागीय चिटणीस असून त्यांनी आयोगाच्या निर्देशनास पुढील प्रसंग आणून दिला. बृहन्मुंबई महानगर पालिकेचे गुरे पकडणारे पथक आणि इतर काही कामगार यांनी गायींच्या गोठ्याचे मालक श्री. बलराम यादव यांच्या पत्नीला काठीने मारले तसेच त्यांनी गुरे पकडून नेण्यास अटकाव करणाऱ्या यादव यांच्या दोन मुलांना सुद्धा मार दिला, जेव्हा जीव वाचविण्यासाठी ती दोन मुले समुद्रकिनाऱ्यावर पळाली तेव्हा बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या लोकांनी त्यांना समुद्राच्या पाण्यात ढकलले. गावकरी तेथे आल्याने त्या लोकांनी पळ काढला. गावकऱ्यांनी स्थानिक पोलीस व अग्निशामक दलाला बोलवूनही ते त्वरीत पोहचले नाही. एक तासाने येऊन त्यांनी यादव यांच्या मुलांची मृत शरीरे ताब्यात घेतली. तक्रारदाराने सांगितले होते कि, पोलीसांनी त्या प्रसंगाची खून म्हणून नोंद न करता, अपघाती मृत्यू म्हणून नोंद केली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने ह्या संबंधातील अहवालाची मागणी डेप्युटी कमिशनर ऑफ पोलिसांकडून केली. त्या अहवालात सांगितले होते कि, श्री. गावनकर पथकाचे प्रमुख आणि इतर सात कामगारांनी यादव यांच्याकडून १०,००० रुपयांची मागणी केली आणि ते द्यायला नकार दिल्याने गावनकरांनी त्यांच्या कामगारांना गाई पकडायला सांगितले. त्या दरम्यान बलराम यादवांच्या दोन मुलांना मार मिळाला. जीव वाचविण्यासाठी समुद्राच्या दिशेने गेले असता पाण्यात पडून त्यांचा मृत्यू झाला. बलराम यादवांच्या तक्रारीवरून त्या सर्व कामगारांना पकडण्यात आले, पण नंतर जामीनावर त्यांची सुटका झाली. अहवालात सांगितले कि त्यांच्या विरोधातील मुकदमा चालू आहे.

**निर्णयाची तारीख—** २० मार्च २००३.

**निर्णय—** पोलीसांद्वारे योग्य कार्यवाही केली गेल्यामुळे प्रकरण बंद करण्यात आले.

**पोलीसांकडून मारहाण**

(८) तक्रार क्र. : ९३/२००१
तक्रारीची तारीख : १० मे २००१
तक्रारदार : श्री. रामदेव साह
प्रतिवादी : पोलीस आयुक्त, मुंबई
सदस्यांचे नाव : न्यायमुर्ती ए. डी. माने (निवृत्त)

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराने सांगितले की, एका सहाय्यक पोलीस निरीक्षकाने त्याला विनाकारण मारले असून त्यामूळे त्याचा हात मोडला. त्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार केली पण काहीही कार्यवाही झाली नाही.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने मुंबईच्या पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागितला आणि नंतर सुनावणीस बोलाविले. ३१ जानेवारी २००२ रोजी डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीसांकडून आलेल्या अहवालात सांगितले होते की, चौकशीअंती तक्रारदाराच्या विरोधात अनेक तक्रारी असल्याचे आढळून आले. आणि संबंधित सहाय्यक पोलीस निरिक्षकाने (ASI) त्याला जेव्हा तो चहा द्यायला आला तेव्हा त्याला समज दिली . तक्रारदाराने सहाय्यक पोलीस निरिक्षकाला (ASI) दुरूत्तरे केली असता त्याच्या हातावर मारून त्याला तिथून निघून जाण्यास सांगितले. तेथून पळून जाताना तो पडला आणि त्याच्या हाताला लागले. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मतानूसार त्याचा हात मोडला नाही. तक्रारदाराने इस्पितळात जबानी दिली की एका अनोळखी व्यक्तीने त्याला मारले पण तो प्रसंग सहाय्यक पोलीस निरिक्षक (ASI) कडून योग्यरित्या हाताळला न गेल्याने, चूकीचा अहवाल लिहीला गेला.

**निर्णयाची तारीख—** २३ जुलै २००२.

**निर्णय—** मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनाम्यातील, १९४८ तील कलम ५ वर भर देऊन सांगितले कि सहाय्यक पोलीस निरिक्षकाचे (ASI) वर्तन नियमबाह्य होते कारण त्यांनी कायदेशीररित्या ते प्रकरण हाताळले नाही. सहाय्यक पोलीस निरिक्षकाविरूद्ध जी प्राथमिक चौकशी केली गेली त्याजोरावर त्याची बदली करण्यात आली. पण आयोगाला हे पूरेसे वाटले नसल्याने, पुढील चौकशीचे आदेश दिले.

**संमती—** पुढील कार्यवाही केल्याबद्दलचा अहवाल अद्याप प्राप्त नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| (९) | तक्रार क्रमांक | : | ६०४/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | ७ सप्टेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्रीमती मुक्ताबाई खंडाले |
| | प्रतिवादी | : | जिल्हाधिकारी, औरंगाबाद |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमुर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराने तक्रारीत सांगितले होते की जिल्हाधिकाऱ्यांकडून त्यांना " संजय गांधी निराधार अनूदान योजना आणि नॅशनल ओल्ड एज पेन्शन स्किम " खाली आर्थिक मदत देत नाही . त्यांनी सांगितले वृद्धत्व आणि शारिरीक आणि मानसिकरित्या सबल नसल्याने त्यांना उपजिविका करणे कठीण जात आहे.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने औरंगाबाद जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून अहवाल मागितला तसेच त्यांना सूनावणीसाठी बोलावले. अहवालात दर्शविले होते कि, कार्यालयीन नोंदणीत तक्रारदाराने चूकीचे नाव दिल्याने त्यांना योजनांचे फायदे मिळत नव्हते. तरी जानेवारी, १९९९ ते जुन, २००० पर्यंत त्यांना योजनांचे फायदे नियमित मिळाले. तसेच अहवालात सांगितले की तक्रारदाराचे नाव व्यवस्थित नोंदल्याने त्यांना पुढील सर्व फायदे व्यवस्थित मिळतील. तसेच अहवालासोबत तक्रारदाराने "कुठलीही तक्रार नसल्याचे" पत्र जोडले होते.

**निर्णयाची तारीख—** ३१ डिसेंबर २००२.

**निर्णय—** पुढील चौकशीची गरज नसल्याचे अहवालावरून स्पष्ट होत असल्याने प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (१०) | तक्रार क्र. | : | ६३०/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २५ सप्टेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. धर्माजी काकडे आणि इतर |
| | प्रतिवादी | : | जिल्हाधिकारी, औरंगाबाद |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदारांनी संबंधीत सरकारी खात्याला विनंती करून सुद्धा त्यांची नावे दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या यादीत समाविष्ट केली गेली नाही .

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने औरंगाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला, तसेच दोन्ही पक्षांना सूनावणीस बोलाविले. ह्या सुनावणीदरम्यान अधिकाऱ्यांनी तक्रारदार दारिद्र्यरेषेखाली आहेत हे मान्य केले, तसेच पालिकाधिकाऱ्यांनी त्यांची नावे यादीत समाविष्ट केली नव्हती. त्यामूळे त्यांना त्यांचे हक्क मिळत नव्हते. संबंधीत अधिकाऱ्यांनी तक्रारदारांच्या अर्जांची तपासणी करून, त्यांना रेशनकार्ड मिळतील ह्याची खात्री पटवून दिली.

**निर्णयाची तारीख—** १० मार्च २००३.

**आयोगाचा निर्णय—** आयोगाला आढळून आले की, संबधित अधिकाऱ्यांचे नीट पहाणी करून दारिद्र्यरेषेखालील लोकांची यादी बनविणे हे कर्तव्य होते. योग्य व्यक्तींची नावे नसण्याकडे आयोगाने लक्ष वेधले आणि तसेच अधिकाऱ्यांना अहवाल द्यायला सांगितले आणि पूढील चौकशीची गरज नसल्याचे सांगितले. तो अहवाल मिळाल्यावर खटला १० मार्च २००३ ला बंद केला.

**अहवाल/रिपोर्ट—** २१ जानेवारी २००३ रोजी आयोगाला जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, औरंगाबादच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मिळाला ज्यात १९ जानेवारी २००३ रोजी तक्रारदारांना रेशनकार्ड मिळाल्याचे नमुद केलेले.

(११) तक्रार क्र. : ७२३/२००१

तक्रारीची तारीख : ६ ऑक्टोबर २००१

तक्रारदार : श्री. किशोर डारुंडे

प्रतिवादी : सचिव, (इरिगेशन) पाटबंधारे खाते, मंत्रालय, मुंबई आणि इतर

सदस्यांचे नाव : न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त)

**तक्रारीचे स्वरूप—** प्रकल्पग्रस्त असून तक्रारदाराची तक्रार होती की, १९९४ पासून तेथील अनुसूचित जातीच्या एकाही उमेदवाराला शासकीय सेवेत समाविष्ट करण्यात आलेले नव्हते. योग्य उमेदवार असूनही तक्रारदाराने त्यांच्या अर्जाची अथवा यादी मधील अनुक्रमाची चौकशी केली असता त्यांना काहीही माहिती उपलब्ध झाली नाही. त्याने अनेकदा यवतमाळच्या जिल्हाधिकाऱ्यांची विनवणी केली, प्राणांतिक उपोषणास बसला, पण काही फायदा झाला नाही.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने मंत्रालयातील पाटबंधारे खात्याच्या सचिवांकडून आणि यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला. उप-सचिवांकडून आलेल्या अहवालात दर्शविले होते की, रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार, कामाची गरज व उमेदवाराची पात्रता ह्या गोष्टी लक्षात घेऊन, तक्रारदाराच्या नियुक्तीबाबत ठरविण्यात येईल.

**निर्णयाची तारीख—** १० ऑक्टोबर २००२.

**निर्णय—** तक्रारदाराचे नाव आधीच प्रकल्पग्रस्तांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले असल्याने ते अनुक्रमे ३८५ होते, तसेच त्याच्या शैक्षणिक पात्रतेबाबतची माहिती नोंदविली गेल्यामुळे प्रकरण बंद करण्यात आले.

(१२) तक्रार क्रमांक : ८४६/२००१

तक्रारीची तारीख : २६ ऑक्टोबर २००१

तक्रारदार : श्रीमती सुभद्राबाई अठवले.

प्रतिवादी : विभागीय आयुक्त, औरंगाबाद

सदस्याचे नाव : न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त)

**तक्रारीचे स्वरूप—** सदर तक्रारीत २००१ पासून "संजय गांधी निराधार" योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य न मिळाल्याबाबत तक्रार केली होती. औरंगाबाद येथील तहसीलदार हे मुद्दाम लाच मागण्याच्या उद्देशाने योजनेंतर्गत सहाय्य करण्याचे टाळत होते अशी देखील तक्रार केली होती.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** विभागीय आयुक्त, औरंगाबाद ह्यांच्याकडुन अहवाल मागविण्यात आला. सदर अहवालात असे नमूद केले होते की, तक्रारदाराला नियमितपणे योग्यरित्या आर्थिक मदत देण्यात येत आहे.

**निर्णयाची तारीख—** २० डिसेंबर २००२.

**निर्णय—** अहवाल पाहून, प्रकरण बंद करण्यात आले.

(१३) तक्रार क्रमांक : १०६९/२००१ आणि १०७०/२००१

तक्रारीची तारीख : १ डिसेंबर २००१

तक्रारदार : श्री. अशोक आणि भिमराज भारटी

प्रतिवादी : जिल्हाधिकारी, अहमदनगर

सदस्यांचे नाव : न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त)

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार भटक्या जमातीतील होते. शिवाय दारिद्र्यरेषेखाली होते. तरीसुद्धा त्यांना रेशनकार्ड मिळाले नव्हते ; तक्रारदारांने शासनाकडे विनंती करून देखील त्यांचे नाव यादीत समाविष्ट केले गेले नाही . तक्रारदाराच्या वडीलांनी अजून एक तक्रार दाखल केली, ज्यात त्यांचे पावसात जमिनदोस्त झालेले घर सरकारने बांधून द्यावे अशी त्यांनी विनंती केली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने अहमदनगर जिल्हाधिकारी आणि अन्न आणि नागरी पुरवठा खात्याच्या सचिवांकडून (मंत्रालय, मुंबई) अहवाल मागविला. १४ नोव्हेंबर २००२ च्या अहवालात नमूद केले की, तक्रारदाराचे नाव दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या यादीत समाविष्ट केले गेले नसून, त्याच्या गरिब परिस्थितीकडे पाहून त्याला रेशनकार्ड देण्यात येईल ; पण त्यासाठी त्याला

नवा अर्ज करावा लागेल. १९ डिसेंबर २००२ रोजी अन्न व नागरी पुरवठा खात्याच्या पत्राद्वारे आयोगास कळविण्यात आले की तक्रारदारांना रेशनकार्ड पुरविण्यात आली होती.

२२ जानेवारी २००३ च्या उप-सचिव, ग्रामविकास आणि जल- संधारण विभागाकडून आलेल्या अहवालाप्रमाणे अर्जदाराचा घराबाबतचा अर्ज मिळाला नसल्याचे व दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या यादीत त्याचे नाव नसल्याचे कळविण्यात आले. आयोगात सुनावणीच्या वेळी अर्जदाराने योग्य शासकीय योजनेंतर्गत पुन: अर्ज करायची तयारी दर्शविली.

**निर्णयाची तारीख—** २७ मार्च २००३.

**निर्णय—** तक्रारदार बऱ्याच काळापासुन दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या यादीत नाव समाविष्ट करण्यास प्रयत्नशील होते ह्याची आयोगाने नोंद घेतली. तक्रारदार खूप काळापासून त्यांचे नाव यादीत दारिद्र्यरेषेखालील समाविष्ट करून घेण्यासाठी धडपड करत होते ज्यामुळे दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी असलेल्या सरकारी योजनांचा त्यांना फायदा मिळेल. तक्रारदारांनी रेशनकार्डसाठी पुन: अर्ज करावा असे सुचवून, आयोगाने प्रकरण बंद केले.

| | | | |
|---|---|---|---|
| (१४) | तक्रार क्र. | : | ३८६/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १३ जूलै २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. शिवाजी एन्. सूतार |
| | प्रतिवादी | : | रेशनिंग ऑफिसर, वरळी |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस्. चिटणीस |

**तक्रारीचे स्वरूप—** रेशनिंग अधिकाऱ्यांने, तक्रारदार आणि त्यांच्या पत्नीचे नाव रेशनिंग कार्डवरून योग्य त्या उपाय योजना न करताच काढून टाकले.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** १२ ऑक्टोबर २००१ ला आयोगाने तक्रारदाराला सूनावणीस बोलाविले आणि वरिष्ठ रेशनिंग (पुरवठा) अधिकाऱ्याकडून अहवाल मागविला. सदर अहवालात असे नमूद केले कि, रेशनकार्डचे प्रमुख धारक श्री. अर्जुन एन्. सूतार ह्यांनी तक्रारदार आणि त्यांच्या पत्नीचे नाव काढून टाकले होते ; आणि सांगितले कि तक्रारदार त्यांच्या पत्नीसह गावास रहायला गेला आहे. सदर तक्रारीची चौकशी करणेस रेशनिंग इन्सपेक्टरांनी तक्रारदाराच्या घरास भेट दिली असता असे आढळले की, तक्रारदार हा त्याच्या भावापासून वेगळा झाला होता, व त्याने त्याच जागेत स्वतंत्र बि-हाड मांडले होते. तरी तक्रारदार रेशनिंग कार्यालयात उपस्थित राहिल्यास त्याला रेशनकार्ड देऊ असे सदर अहवालात नमूद केले होते.

**निर्णयाची तारीख—** २३ जुलै २००२.

**निर्णय—** रेशनिंग कार्यालयाद्वारे तक्रारीचे निरसन होऊ शकेल असे आयोगाचे मत होते. तक्रारदाराला तसे कळविण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (१५) | तक्रार क्र. | : | ४८५/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १८ ऑगस्ट २००१ |
| | तक्रारदार | : | श्रीमती कमलाबाई चाचकर |
| | प्रतिवादी | : | जिल्हाधिकारी, चंद्रपूर |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम्. आर. पाटील |

**तक्रारीचे स्वरूप—** सॉईल कन्झवेशन खात्यात शिपाई म्हणून कामास असलेल्या मृत पतीच्या जागेवर अनूकंपा तत्वावर नेमणूक करावी असा लिखित अर्ज तक्रारदाराने केला होता. अनेक भेटी देऊन सूद्धा त्यांचा अर्ज फेटाळला जात होता. त्यांना सांगण्यात आले की त्यांनी नियमानुसार एक वर्षाच्या आत अर्ज केला नाही. तद्नंतर त्यांच्या मोठ्या मुलाने त्या जागेवर अर्ज केला असता त्याचा अर्ज पाच वर्ष उशीराने आल्याचे सांगून फेटाळला गेला.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून त्यांना सूनावणीसाठी बोलाविले. ११ जानेवारी २००२ रोजी सूपुर्द केलेल्या अहवालात, नमुद केले होते की, तक्रारदाराकडून अनुकंपा तत्वावर नेमणुक होणेबाबत केलेला अर्ज योग्य त्या काळातच आला असून, तो सरकारकडे पुढील कारवाईसाठी पाठविण्यात आला आहे.

**निर्णयाची तारीख—** ६ जानेवारी २००३.

**निर्णय—** आयोगानूसार हा खटला सरकारद्वारा पूनः विचारात घेण्याजोगा होता कारण काही तांत्रिक बाबींसाठी तो अर्ज फेटाळण्यात आला होता. आयोगाने सरकारला तक्रारदाराला मध्यस्ती शिवाय उत्तर देण्यास सांगितले व ह्या निर्णयाची सुचना आयोगाला द्यावी असेही म्हटले.

**कारवाई—** शासनाच्या उत्तरात असे कळविण्यात आले कि, सदर अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार केला असता असे आढळले कि अर्जदाराची अनुकंपा तत्वावर नेमणुक करण्यास कोणतीही तरतूद नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| (१६) | तक्रार क्र. | : | ५१३/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २४ ऑगस्ट २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. मनोहर धात्रक |
| | प्रतिवादी | : | संचालक, तांत्रिक शिक्षण विभाग, मुंबई |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम्. आर. पाटील |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार काम करीत असताना झालेल्या अपघाताने जवळजवळ ५८ टक्के अपंग झाल्याने त्यांनी तांत्रिक शिक्षण विभागातून ऐच्छिक निवृत्ती घेतली. पण संबंधीत अधिकाऱ्यांना विनंती करूनसूद्धा त्यांच्या मुलाला अनुकंपा तत्वावर नोकरी दिली जात नव्हती.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने संचालक, तांत्रिक शिक्षण, मुंबई यांच्याकडून अहवाल मागवून नंतर त्यांना सूनावणीस बोलावले. अहवालात सांगितले होते की, तक्रारदाराच्या मुलाला नोकरी मिळू शकते, व तसे आवेदनपत्र शासनाकडे पाठविले आहे. शासनाकडून संचालक, तांत्रिक शिक्षण विभाग, मुंबई, यांना कळविण्यात आले, तक्रारदाराने ऐच्छिक निवृत्ती घेतली असून, कुठल्याही वैद्यकीय अधिकाऱ्याने त्यांना नोकरी करण्यास शारिरीकदृष्ट्या अपात्र ठरविले नव्हते. निवृत्तीपश्चात तक्रारदारास कोणतीही इतर नियुक्ती देण्यात आली नाही. त्यामुळे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यास त्यांचा मुलगा अपात्र आहे.

**निर्णयाची तारीख—** ४ मार्च २००३.

**निर्णय—** सरकारकडून २३ एप्रिल २००१ च्या निर्णयाची प्रत तक्रारदाराला दिली जावी अशी आयोगाने इच्छा व्यक्त केली. तसेच तक्रारदाराची इच्छा असल्यास शासनाच्या निर्णयाविरूद्ध ते पुन्हा तक्रार दाखल करु शकतात आणि शासन ती तक्रार नव्याने घेऊन, योग्य ती कारवाई होऊ शकेल असा सल्ला दिला.

| | | | |
|---|---|---|---|
| (१७) | तक्रार क्र. | : | ११११/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १४ डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. सी. बी. यादव |
| | प्रतिवादी | : | जिल्हाधिकारी, अमरावती |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम्. आर. पाटील |

**तक्रारीचे स्वरूप—** श्रीमती शोभा अहिरे यांना केवळ रु. ४०,०००/- भरून योग्य कागदपत्रे न तपासता श्री. शहाणे, पर्यवेक्षक, व श्री. शहाणे, स्वीय सहाय्यक, श्री. कुलकर्णी, समाज कल्याण विभाग ह्यांनी जातीचा दाखला दिला. तक्रारी प्रमाणे सदर व्यक्ती अवैध दाखल्यांना वैध बनवून विकत आहेत.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडून अहवाल मागविला आणि सूनावणीस बोलाविले. संबंधीत अधिकाऱ्यांच्या खुलाश्यानूसार, श्रीमती शोभा आहिरे यांनी योग्य कागदपत्रे, जाती प्रमाणपत्रासाठी जोडली होती आणि नंतरच समाज कल्याण विभागाकडून सशर्त प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच त्यांच्याकडून (तक्रारदाराकडून) लिहिले गेलेले पत्र जोडले गेले ज्याच्यात सांगितले होते कि त्यांची काहिही तक्रार नसून त्यांचे नाव कोणी इतराने वापरले आहे.

**निर्णयाची तारीख—** २३ डिसेंबर २००२.

**निर्णय—** अहवाल लक्षात घेता, आयोगाने प्रकरण बंद केले. तक्रारदाराला सल्ला दिला कि त्याला अजुनही जातीच्या दाखल्याच्या सत्यतेबाबत तक्रार करावयाची असल्यास मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा. उच्च न्यायालयात रिट याचीका करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| (१८) | तक्रार क्र. | : | १०४५/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २८ ऑक्टोबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. उदय चिटणीस |
| | प्रतिवादी | : | मुख्य अभियंता व श्री. बाल्डवा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, परभणी |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती, ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदारानुसार श्री. पी. आर. बाल्डवा आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वर्क्स विभागाचे इतर अधिकारी, गैरव्यवहारी असून लाच घेतात. पण त्यांच्यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. तक्रारदाराने सांगितले की ते पुरावा नष्ट करू शकतात.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण वर्क्स, परभणीकडून अहवाल मागविला, नंतर त्यांना सुनावणीस बोलाविले. ८ मार्च २००२ च्या अहवालात असे सांगितले होते की, बाल्डवांविरुद्ध तक्रार जाताच त्यांची बदली दुसऱ्या खात्यात करण्यात आली आहे. तक्रारदाराच्या बाकीच्या तक्रारींच्या संदर्भात सांगण्यात आले की, खात्याकडे गैरव्यवहारांची आणि लाच-लुचपतीची नोंद केली असून, त्यानूसार सत्यता तपासण्यासाठी चौकशी सुरू आहे. गुन्हा सिद्ध झाल्यास अपराध्यांविरूद्ध योग्य ती कारवाई केली जाईल. नंतर तक्रारदाराने मुख्य अभियंत्याच्या विरोधातील तक्रार मागे घेतली. २३ मे २००२ रोजी श्री. बाल्डवांकडून आलेल्या उत्तरात म्हटले होते की, त्यांच्या नोकरीच्या कारकिर्दीत कुठल्याही गैरव्यवहारात गुंतले नव्हते. ६ जून २००२ रोजी आयोगाला तक्रारदाराकडून ते आयोगाने केलेल्या कार्यवाहीमुळे समाधानी असल्याने प्रकरण बंद केले जावे ह्या आशयाचे पत्र आले.

**निर्णयाची तारीख—** २० डिसेंबर २००२.

**निर्णय—** अहवाल आणि तक्रारदाराचे समाधान झालेले पाहून आयोगाला पुढील चौकशीची जरूरत वाटली नाही. मुकदमा बंद करण्यात आला.

| | | | |
|---|---|---|---|
| (१९) | तक्रार क्र. | : | ७५८/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | ८ ऑक्टोबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. जितेंद्र सिन्हा राणा |
| | प्रतिवादी | : | उप संचालक, क्रीडा आणि युवक सेवा, औरंगाबाद. |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार, P.E.S. विद्यालय, शारीरिक शिक्षणाचा विद्यार्थी असून, त्यांनी सांगितले की, M.P.Ed साठी प्रवेश घेताना श्री. आय. डी. आलटे आणि एक कारकून यांनी लाच मागितली. तसेच श्री. आलटे यांनी विद्यार्थ्यांना धमकी दिली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने उप संचालक क्रीडा, आणि युवक सेवा, औरंगाबाद यांचकडून खुलासा मागविला. ३१ जुलै २००२ रोजी आलेल्या अहवालात दर्शविलेले की, तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या आधारावर चौकशी चालू असून; असे आढळले की तक्रारदारच्या तक्रारीत तथ्य नाही. तद्नंतर आयोगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालयाच्या प्रबंधकांना सुनावणीसाठी बोलाविले. २९ ऑगस्ट २००२ च्या त्यांच्या अहवालात सांगितले गेले की, M. P.Ed च्या प्रवेशादरम्यान संबधित विद्यालयाकडून आणि कर्मचाऱ्यांकडून जास्त फी घेतली गेली नाही. याच संदर्भात विद्यार्थ्यांशी बोलताना, विद्यार्थ्यांनीही सांगितले की, त्यांच्याकडून जास्तीचे ५,००० रुपये घेण्यात नाही आले आहेत.

**निर्णयाची तारीख—** १६ सप्टेंबर २००२.

**निर्णय—** आयोगाकडे आलेल्या चौकशी अहवालावरून स्पष्ट होते की ह्या प्रकरणात फक्त संशयाच्या आधारावर काणालाही दोषी मानणं चूकीचं आहे. पण असे प्रसंग भविष्यात घडू नयेत म्हणून खबरदारीसाठी विद्यालयाने पुढाकार घेऊन, प्रवेश फी ' डिमांड -ड्राफ्ट ' द्वारा घ्यावात असे आयोगाने सूचित केले.

**डिमोलिशन (बेकायदेशीर बांधकामाची पाडणी)**

| | | | |
|---|---|---|---|
| (२०) | तक्रार क्र. | : | ११३२/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १८ डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. के. पी. कोळी |
| | प्रतिवादी | : | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदारानुसार, लॉंड्री मालक भाईलाल यांनी विनापरवानगी पाण्याची मोठी टाकी बांधली असून ती तशीच उघडी ठेवली आहे. त्यामुळे तक्रारदार आणि इतर रहिवाशांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही त्यांची दखल घेतली गेली नाही.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** महापालिका आयुक्तांकडून अहवाल मागविला. ६ जून २००२ च्या अहवालात आयुक्तांकडून नमूद करण्यात आले होते की, आयोगाची नोटीस प्राप्त होताच त्या जागेला भेट दिली असता, ते बेकायदेशीर बांधकाम दिसून आले व २७ मे २००२ ला ते पाडण्यात आले.

**निर्णयाची तारीख—** ७ ऑक्टोबर २००२.

**निर्णय—** बेकायदशीर बांधकाम पाडल्याने खटला बंद करण्यात आला.

**पोलीसांद्वारे तक्रार नोंदविण्यास नकार**

| | | | |
|---|---|---|---|
| (२१) | तक्रार क्र. | : | ५५१/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २४ डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्रीमती नंदा. जे. तिवारी. |
| | प्रतिवादी | : | पोलीस उप आयुक्त, माटुंगा, मुंबई. |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराच्या अल्पवयीन मुलास रिक्षेची धडक बसल्याने त्याला दुखापत (फ्रॅक्चर) झाली, मुलास कुर्ला नर्सिंग होम मध्ये दाखल केले, जेथे डॉ. आनंद हजारे ह्याने त्याच्यावर औषधोपचार केला. तदनंतर अपघाताबाबत तक्रार करण्यास तक्रारदार अनेक पोलीस चौकी, एल. आय.जी. पोलीस चौकी, इत्यादी येथे गेल्या, परंतु प्रत्येक चौकीत त्यांची तक्रार नोंदविण्यास नकार देण्यात आला व त्यांना इतर कुठल्याही पोलीस चौकीत जावे असे सांगितले.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने पोलीस उपायुक्त, मुंबई यांच्याकडून अहवाल मागविला. दि. १७ जून २००२, आयोगाकडे पोलीस उप आयुक्त, झोन V, माटुंगा, मुंबई यांच्याकडून आलेल्या अहवालात नमूद केले गेले होते की, रिक्षाचालकाने स्वतःहून त्या मुलाला कुर्ला नर्सिंग होम येथे दाखल केले आणि वैद्यकीय उपचार करविले. त्यामुळे तक्रारदाराने चालकाविरूद्ध तक्रार नोंदविली नव्हती. नंतर तक्रारदाराने वैद्यकीय उपचारांसाठी अजून पैशाची मागणी केली जी रिक्षाचालकाने मानली नाही, त्यामुळे नातेवाईकांच्या प्रभावाखाली येऊन तक्रारदाराने तक्रार दाखल केली. चौकशी दरम्यान तक्रारदाराने पोलीसांना सांगितले की, तिने अपघात झाल्यावर तक्रार नोंदविली नव्हती. अहवालात पोलीस उप आयुक्त यांजकडून नमूद केले गेले की, त्या मुलाला आता काहीही त्रास नसून तो शाळेत जाऊ लागला आहे आणि तक्रारदाराची सुद्धा काहीही तक्रार नाही.

**निर्णयाची तारीख—** ३१ जुलै २००२.

**आयोगाचा निर्णय—** अहवालात सांगितलेल्या सत्य परिस्थितीमुळे आयोगाने प्रकरण बंद केले.

**समान कामासाठी समान वेतन**

| | | | |
|---|---|---|---|
| (२२) | तक्रार क्र. | : | १०६७/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १ डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. एम. एम. येवले आणि इतर |
| | प्रतिवादी | : | प्राचार्य, विद्यूत विद्या मंदीर, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) डेप्युटी डायरेक्टर, व्होकेशनल एज्यूकेशन, ॲण्ड ट्रेनिंग रिजनल सेंटर. |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार व इतरांकडून केल्या गेलेल्या तक्रारीनुसार ते विद्युत विद्यामंदीर औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) चे कर्मचारी असून त्यांना पगार, सुट्ट्या, भविष्यनिर्वाह निधी व इतर सवलती मिळत नव्हत्या व त्यांना मिळणारे वेतन व त्याच श्रेणीतील इतर सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनात तफावत होती. त्यामुळे तक्रारदार व इतरांनी, प्राचार्य आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगाव यांच्या समोर तक्रार करून सुद्धा काही फायदा झाला नाही. ऑगस्ट २००१ पासून प्राचार्यांच्या सांगण्यानुसार त्यांच्या वेतनातून ३०% (टक्के) वेतन कापले जाऊ लागले. या संदर्भात अधिकाऱ्यांनी तक्रारदारांना तोंडी सांगितले की, असमाधानी असल्यास राजीनामा द्यावा.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने ह्या संदर्भात उप संचालक, व्यवसायिक शिक्षण व स्थानिक प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांच्याकडून अहवाल मागविला. १ मार्च २००२ च्या अहवालानुसार कळविण्यात आले की, विद्युत विद्यामंदीर खाजगी आणि विनाअनुदानित संस्था असून, वेतनश्रेणी, भविष्यनिर्वाह निधी, सुट्ट्या हे मुद्दे त्या संस्थेच्या प्रशासन, प्राचार्य किंवा अध्यक्षांवर अवलंबून आहेत. वेतनश्रेणीबाबत खासगी विनाअनुदानित संस्थांना सूचना दिलेल्या असतात.

**निर्णयाची तारीख—** १४ ऑगस्ट २००२.

**निर्णय—** खाजगी संस्था आयोगाच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याने प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (२३) | तक्रार क्र. | : | ५२३/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २७ फेब्रुवारी २००२ |
| | तक्रारदार | : | श्रीमती छाया लोखंडे. |
| | प्रतिवादी | : | सचिव, वैद्यकीय शिक्षण खाते व इतर. |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार १९८६ पासून तृतिय श्रेणी कर्मचारी म्हणून इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे काम करीत होत्या. त्यांना रु. २९० महिना असे अपुरे वेतन होते. त्यामुळे त्यांनी औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे इतर तृतिय श्रेणी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाइतके वेतन मिळावे यासाठी तक्रार केली. न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिला. निर्णय तक्रारदाराच्या बाजूने असूनही त्यांची सेवा/वेतन नियमित केले गेले नाही. तक्रारदाराने समान काम समान वेतनाकरिता सर्व संबंधित अधिकाऱ्यांजवळ अर्ज करूनही त्यांना ते मिळाले नाही.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग व इतरांकडून अहवाल मागविला व त्यानंतर सुनावणीस बोलविले. ७ मे २००२ च्या वैद्यकीय शिक्षण व संचालक यांच्या दिनांक ७ मे २००२ च्या अहवालात असे नमूद केले होते की, तक्रारदार हा १९८६ पासून इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय येथे विनाखंड सेवेत असल्याने त्यांची नियमित वेतनश्रेणीवर 'लिपिक' ह्या पदावर नेमणूक करणे शक्य होते. ५ जुलै २००२ रोजी तक्रारदारांची नियमित नेमणूक करण्यात आली.

**निर्णयाची तारीख—** ७ मार्च २००३.

**निर्णय—** महाराष्ट्र शासनाकडून केली गेलेली योग्य कार्यवाही पाहून प्रकरण बंद केले गेले.

| | | | |
|---|---|---|---|
| (२४) | तक्रार क्र. | : | ११८२/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २८ मे २००२ |
| | तक्रारदार | : | डॉ. शामल डोईफोडे |
| | प्रतिवादी | : | संचालक, उच्च शिक्षण, पुणे. |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराने नमूद केले की, त्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या नुसार, थकबाकी मिळाली नाही. त्या ज्या संस्थेत प्राध्यापक म्हणून काम करतात तेथून थकबाकी मिळाली नसून, तेथील इतर कर्मचाऱ्यांना थकबाकी मिळाली आहे.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून अहवाल मागविला, तसेच नंतर सुनावणीस बोलावले. ७ सप्टेंबर २००२ च्या अहवालात असे नमूद केले होते की, थकबाकी सर्व कर्मचाऱ्यांना देण्यात आली असून ज्यांनी संस्था सोडली त्यांनाच थकबाकी दिली गेली नाही आणि तक्रारदार त्यांच्यापैकी आहे. तक्रारदाराला एका महिन्याच्या आत थकबाकी देण्यात यावी असे आयोगाने सुचविले. २६ नोव्हेंबर २००२ रोजी आयोगाला संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून तक्रारदाराला थकबाकी मिळाल्याचे नमूद करणारे पत्र आले.

**निर्णयाची तारीख—** २८ नोव्हेंबर २००२

**निर्णय—** तक्रारदाराला थकबाकी मिळाल्याने, प्रकरण बंद केले गेले.

**अनैतिक व्यापार**

| | | | |
|---|---|---|---|
| (२५) | तक्रार क्र. | : | २४/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | ३ जानेवारी २००१ |
| | तक्रारदार | : | सचिव, भीमराव आंबेडकर मेमोरिअल ॲन्ड वेल्फेअर सोसायटी, दार्जिलिंग. |
| | प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, मुंबई |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील |

**तक्रारीचे स्वरूप—** नेपाळ मधील मुलींना मुंबईत वेश्या बनवून विकले जाते, असे तक्रारदाराकडून आयोगाला सांगण्यात आले. तसेच यासंदर्भात, योग्य ती कारवाई करण्याची विनंती केली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने, पोलीस आयुक्त, मुंबई, स्त्री व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई, सचिव, सामाजिक कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून या संदर्भात अहवाल मागविला. २८ डिसेंबर २००१ च्या उप आयुक्तांकडून आलेल्या अहवालात सांगितले होते की, जेव्हा पोलीसांना स्त्रियांच्या होणाऱ्या व्यापाराबद्दल माहिती मिळते, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई केली जाते. स्त्री व बालकल्याण विभागाने अशा प्रकारचा अहवाल देण्यास असमर्थता दर्शविली कारण तक्रारदाराने कुठल्याही प्रत्यक्ष प्रसंगाचा उल्लेख केला नव्हता.

**निर्णयाची तारीख—** १ जुलै २००२.

**निर्णय—**तक्रारदाराने तक्रारीत अशा कुठल्याही व्यक्तीचा उल्लेख केला नव्हता, जिच्या मानवी हक्कांचा भंग झाला होता, तसेच पोलीस वेळोवेळी योग्य कारवाई करत असल्याने तक्रार बंद करण्यात आली. मंत्रालयातील संबंधित खात्यातील सचिवांना ह्यात लक्ष देण्यास सांगून सरकारने केलेल्या कारवाईबद्दल आयोगाला कळविण्यास सांगितले.

**केलेली कारवाई—** संबंधित खात्याकडून केल्या जाणाऱ्या कारवाईची प्रतिक्षा आहे.

**निष्क्रियता**

| | | | |
|---|---|---|---|
| (२६) | तक्रार क्र. | : | ६६५/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २७ सप्टेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. श्रावण केसू म्हासे |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, अहमदनगर |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराची कायदेशीरदृष्ट्या अज्ञान मुलगी कु. सरस्वती हिला श्री. शिवाजी यांच्याशी अनैतिक संबंधातून अपत्य झाले. श्री. शिवाजी यांच्या नातेवाईकांनी तक्रारदाराला शिवाजी आणि सरस्वती यांच्या विवाहाची हमी दिली ; पण त्यांनी त्या दोघांचे लग्न लावून दिले नाही. तक्रारदाराने पोलीसांत तक्रार केली पण त्यांच्या तक्रारीची दखल घेतली नाही. या उलट सत्य लपवून त्यांच्या मुलीवर चार्ज शीट दाखल केली. तक्रारदाराने सांगितले की त्यांनी नवजात मुलीला शेतात फेकून दिले.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने पोलीस आयुक्त, अहमदनगर यांच्याकडून यासंदर्भात अहवाल मागविला आणि नंतर त्यांना सुनावणीस बोलाविले. त्या अहवालात नमूद केले होते की, श्री. विष्णू म्हसे ह्यांच्याकडून शेतात नवजात शिशू सापडल्या विषयी तक्रार आली होती. चौकशी केल्यावर असे समजले की. श्री. शिवाजी आणि कु. सरस्वती यांच्या अनैतिक संबंधातून ते मूल जन्माला आलेले, शिवाजी यांनी दिलेले लग्नाचे वचन पाळले नाही व त्यामुळे कु. सरस्वतीनेच ते मुल शेतात फेकून दिले होते. लहान मुल शेतात फेकल्याच्या आरोपावरून पोलिसांनी कु. सरस्वतीला अटक केली व ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. पोलीसांनी श्री. शिवाजी विरुद्ध गुन्हा दाखल करुन घेतला होता तसेच पुढील तपासकार्य चालू आहे.

**निर्णयाची तारीख—** २० डिसेंबर २००२.

**निर्णय—**पोलिसांकडून कारवाई केली जात असल्याने, आयोगाला पुढील चौकशीची गरज न वाटून खटला बंद केला गेला.

| | | | |
|---|---|---|---|
| (२७) | तक्रार क्र. | : | ३९२/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | १८ फेब्रुवारी २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. सुरेखा परशु सावंत |
| | प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, मुंबई |
| | सदस्याचे नाव | : | न्यायमूर्ती. ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरुप—** शेजाऱ्याने बेकायदेशीरपणे झाडे तोडली व बांधकाम केलेबाबत तक्रार केल्यामुळे त्यांने तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांवर तलवारीने हल्ला केला असे तक्रारीत नमूद केले आहे. योग्य तक्रार करूनदेखील काही कारवाई केली गेली नाही. काही पोलीस व शासकीय अधिकाऱ्यांचा सदर बाबतीशी संबंध असल्यामुळे चौकशी केली गेली नाही असा आरोप तक्रारदारने केला आहे.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडून अहवाल मागविला २४ ऑगस्ट २००२ च्या अहवालात सांगितले की पोलीसांनी योग्य ती कारवाई केली आहे.

**निर्णयाची तारीख—** १ ऑक्टोबर २००२

**आयोगाचे निर्णय—** अहवालाच्या आधारे आयोगाने पुढील चौकशीची जरूरत नसल्याचे नमूद करून प्रकरण बंद केले गेले.

| | | | |
|---|---|---|---|
| (२८) | तक्रार क्र. | : | ७३०/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २६ मार्च २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. रामकिशोर अगरवाल |
| | प्रतिवादी | : | जिल्हाधिकारी, गोंदिया |
| | सदस्याचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराची अशी तक्रार होती की त्यांच्या (आदित्य नावाच्या) मुलाचे नाव जन्म-मृत्यू नोंदवहीत नव्हते व संबंधित पाने नोंदवहीतून नाहिशी झालेली होती. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आदित्यचे नाव शाळेतील दाखल्यानुसार नोंद करून घेण्यास सांगितले, पण तसे करण्यास अधिकाऱ्यानी नकार दिला. तक्रारदाराने याबद्दल पोलीस स्टेशन आणि तहसीलदार, आमगाव यांच्याकडे तक्रार नोंदविली पण ती दुर्लक्षिली गेली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने जिल्हाधिकारी, गोंदिया यांजकडून अहवाल मागविला. २० ऑगस्ट २००२ च्या अहवालात त्यांनी नमूद केले की, तक्रारदाराने व त्यांच्या भावाने वेगवेगळ्या दिलेल्या लेखी जबानींद्वारे आदित्यच्या पालकत्त्वावर हक्क सांगितला होता. त्यामुळे केलेल्या चौकशीदरम्यान असे आढळून आले की, तक्रारदाराचे बंधू, श्री. गोविंदलाल हे आदित्यचे खरे वडील आहेत. तक्रारदाराने ते मानले आणि त्यानुसार निर्णय घेतला गेला.

**निर्णयाची तारीख—** २१ डिसेंबर २००२.

**निर्णय—** जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय व तक्रारदाराची सदर निर्णयास हरकत नसल्याचे लक्षात घेता प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (२९) | तक्रार क्र. | : | ९९०/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २६ नोव्हेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्रीमती किरण कोठारी |
| | प्रतिवादी | : | प्रधान सचिव, सहकार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई |
| | सदस्याचे नाव | : | न्यायमूर्ती. ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार लक्ष्मी नारायण को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. चे सभासद होत्या. त्यांच्या मतानुसार सोसायटीने अनेक कायद्यांकडे दुर्लक्ष करून गेल्या १५ वर्षांपासून पैशांची अफरातफर केली. त्यांनी अनेकदा को-ऑपरेटिव्ह विभागात तक्रारी केल्या पण त्या दुर्लक्षिल्या गेल्या.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने प्रिन्सीपल सेक्रेटरी, को-ऑपरेशन डिपार्टमेंट, मंत्रालय, मुंबई यांजकडून अहवाल मागविला तसेच दोन्ही पक्षांना सुनावणीस बोलावले. १० एप्रिल २००२ रोजी डिव्हिजनल जॉईंट रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटी,

मुंबईकडून आलेल्या अहवालात नमूद केले होते की, तक्रारदाराच्या तक्रारीची दखल घेऊन, कारवाई करण्यात आली आहे. आणि ज्या थोड्या तक्रारींवर उपाययोजना करणे बाकी आहे ती थोड्याच काळात केली जाईल. २ मार्च २००२ आयोगाला सेक्रेटरी (Co-op) कडून आलेल्या पत्रात नमूद केलेले की तक्रारींवर योग्य ती कारवाई करण्यात आली आहे. तक्रारदाराने तिची थकबाकी अजूनही फेडली नाही.

**निर्णय तारीख—** २ सप्टेंबर २००२.

**निर्णय—** जरी ही तक्रार आयोगाकडे सरळ आली नव्हती तरी आयोगाने खात्री करून घेतली की दोन्ही पक्ष मतभेद मिटवण्यास तयार आहेत. तक्रारदाराच्या तक्रारींवर जी कारवाई करण्यात आली ती लक्षात घेता, आयोगाने प्रकरण बंद करण्याचा निर्णय घेतला.

| | | | |
|---|---|---|---|
| (३०) | तक्रार क्र. | : | ४४४/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २३ जुलै २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. अमोल रुद्रके |
| | प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, पुणे |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारीनुसार तक्रारदारांच्या सासरचे लोक, त्यांना त्यांच्या पत्नीला भेटू देत नव्हते. त्यांना त्यांच्या पत्नीने स्वतःला मानसिक दबावामुळे काही दुखापत करून घेतल्याची शंका होती. त्यामुळे त्यांनी पोलिसात तक्रार केली पण काही कारवाई केली गेली नाही.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पुण्याच्या, पोलीस आयुक्तांचा अहवाल मागविला. सदर अहवालात सांगण्यात आले होते की, तक्रारदार व त्यांच्या पत्नीने घरच्यांच्या मर्जीविरूद्ध लग्न केले होते. मुलीच्या घरच्यांनी बहाणा करून तिला बोलावून घेतले व नंतर तक्रारदाराशी तिला संपर्क साधू दिला नाही. पोलिसांनी त्या लोकांना समजावले तसेच तक्रारदाराच्या पत्नीने तिला माहेरच्यांकडून कसलाही त्रास झाला नसल्याचे नमूद केले. आणि तसेच तिने नवऱ्याबरोबर राहण्याची इच्छा प्रकट केली. पत्नी परत आल्याने तक्रारदाराची तक्रार उरली नाही.

**निर्णयाची तारीख—** १७ जून २००२.

**निर्णय—** पोलीसांच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे तक्रारदाराची तक्रार नसल्याने प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (३१) | तक्रार क्र. | : | ४५/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | १९ डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. रामजी महेश्वरी ''संजोत'' सचिव, वर्ल्ड ह्युमन युनिटी कॉन्सिल,(इंडिया), महाराष्ट्र युनिट |
| | प्रतिवादी | : | पोलीस उप आयुक्त, पोलीस एअरपोर्ट झोन, मुंबई |
| | सदस्याचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस |

**तक्रारीचे स्वरूप—** हॉटेल लीला, अंधेरी (पूर्व) येथील सुरक्षा रक्षक राजेंद्र महाले ह्यांनी हॉटेलच्या आवारात स्वतःला जाळून घेतले. ही अनेक वृतपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी वर्ल्ड ह्युमन युनिटी कॉन्सिल; ह्या एन.जी.ओ. ने आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. तक्रारदाराच्या मते श्री. महाले यांचा संबंधित अधिकाऱ्यांकडून खून झाला असावा त्यामुळे श्री. महाले यांच्या जीविताचा हक्कांचा भंग झाला.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने सहार एअरपोर्ट पोलीस उप आयुक्तांकडून अहवाल मागविला. १ मार्च २००३ रोजी पोलीस उप आयुक्तांकडून आलेल्या अहवालात नमूद केले होते की, अधिकारी आणि करारावर असलेले कर्मचारी यांच्यात मतभेद होते. सदर अहवालात श्री. महाले ह्यांचा शवविच्छेदन अहवाल जोडला आहे. ज्यात श्री. महाले ह्यांचा मृत्यू जळून झाल्याचे व अनैसर्गिक असल्याचे सांगितले आहे.

**निर्णयाची तारीख—** २००२.

**आयोगाचा निर्णय—** श्री. राजेश महाले यांच्या मृत्यूस शासकीय कर्मचारी - अधिकारी जबाबदार नसल्याने आयोगाने प्रकरण बंद करण्याचा निर्णय घेतला.

| | | | |
|---|---|---|---|
| (३२) | तक्रार क्र. | : | ४३६/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २५ फेब्रुवारी २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. नटवरलाल गोहील. |
| | प्रतिवादी | : | पोलीस उप आयुक्त - झोन II |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराने सांगितले की, रात्रीच्या ३ वाजता श्री. अजय सोलंकी व इतर चार व्यक्तींनी त्याच्यावर सुरीने हल्ला केला. तक्रार नोंदवायला गेलो असताना संबंधित अधिकाऱ्यानी दुर्लक्ष केले. जे. जे. इस्पितळात त्याच्यावर वैद्यकीय उपचार केले गेले नाहीत. त्याने नमुद केले की त्याचे व त्याच्या पत्नीचे हस्ताक्षर पोलीसांनी जबरदस्तीने घेतले आणि त्यांना घरी जायला सांगितले. त्याने त्याच्या बहिणीच्या अपहरणाबद्दल तक्रार नोंदविल्याने त्याला धमकी मिळाल्याचे त्याने नमूद केले.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने संबंधित उप आयुक्तांकडून अहवाल मागविला. २ डिसेंबर २००२ च्या अहवालात असे नमूद केले की, तक्रारदाराने हरविलेल्या बहिणीबद्दल तक्रार नोंदविली होती पण चौकशी दरम्यान असे आढळून आले की ती स्वतःहून जयपूरला रहायला गेली आहे. आणि पुढे अजून त्रास वाढू नये म्हणून आपल्या भावाला तिने कळविले नव्हते. १६ फेब्रुवारी २००२ रोजी तक्रारदाराच्या भावाने पोलीसांना फोन करून सांगितले की तक्रारदारावर हल्ला झाला असून, तो देशमुख गल्लीत पडला आहे. तेथे पोहचल्यावर पोलीसांना समजले कि तक्रारदार तेथे दारूच्या नशेत पडला आहे. जे. जे. रुग्णालयातील वैद्यकीय तपासणीमध्ये डॉक्टरांच्या अनुसार तो दारूच्या नशेत होता. पोलीस ठाण्यातील तक्रारदार व त्याच्या पत्नी यांच्या जबानीत फरक आढळला. त्याला झालेली दुखापत अत्यल्प होती. २६ ऑक्टोबर २००२ ला दिलेल्या जबानीत तक्रारदाराने सांगितले की त्याची अजय सोलंकी विरुद्ध तक्रार नाही.

**निर्णयाची तारीख—** ७ जुलै २००२.

**निर्णय—** पोलिसांचा अहवाल लक्षात घेता प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (३३) | तक्रार क्र. | : | १७३०/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | ११ सप्टेंबर २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. केशव संभाजी वाघ |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, धुळे |
| | सदस्याचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस |

**तक्रारीचे स्वरूप—** शेजारी श्री. शिंदे यांनी जातीवरून अपशब्द उच्चारून तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियास मारहाण करून त्यांची पोलीसात तक्रार केली. तक्रारदारास अटक करून शासकीय रुग्णालयात नेण्यात आले, जेथे त्यांची प्रकृती "ठीक" असल्याचे प्रमाणित केले गेले. (त्यांना योग्य वैद्यकीय उपचार मिळाले नाहीत.) तसेच तक्रारदाराच्या भावाचा पाय फ्रॅक्चर झाला असता त्याला उपचाराशिवाय परत पाठविण्यात आले. सदर बाबीची चौकशी व्हावी अशी तक्रारदाराची विनंती होती.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने अधीक्षक जिल्हा रुग्णालय धुळे, व पोलीस अधीक्षक यांच्याकडून अहवाल मागविला. ११ नोव्हेंबर २००२ ला सिव्हिल सर्जन आणि सुपरिटेंडन्ट धुळे यांच्याकडून आलेल्या अहवालात सांगितले, की तक्रारदाराने इस्पितलातील दिल्या गेलेल्या वागणुकीबद्दल खोटे सांगितले आहे. कारण त्यांच्यावर योग्य उपचार केले गेले होते. पोलीस अधीक्षकांच्या अहवालानुसार तक्रारदार आणि त्याचा शेजारी यांच्यातील भांडणानंतर दोन्ही पक्षांना तुरुंगात ठेवले होते. आणि त्यांच्या नातेवाईकांना कळविण्यात आले होते. नंतर दोन्ही पक्षांनी लेखी जबानी दिली जिच्यात त्यांना एकमेकांविरुद्ध काही तक्रार नव्हती.

**निर्णयाची तारीख—** २८ जानेवारी २००३.

**निर्णय—** पोलीस अधीक्षक, धुळे व जिल्हा रुग्णालयातून आलेल्या अहवालानुसार तक्रारदाराला तक्रार नसल्याचे निदर्शनास आल्याने आयोगाने प्रकरण बंद केले.

| | | | |
|---|---|---|---|
| (३४) | तक्रार क्र. | : | १९०९/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २३ ऑक्टोबर २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. विरेंद्र बहादुर सिंग |
| | प्रतिवादी | : | पोलीस उप अधीक्षक, कल्याण |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस |

**तक्रारीचे स्वरूप—** आपल्या मुलीच्या मृत्यू प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांने योग्य चौकशी करावी असे आदेश आयोगाने द्यावेत अशी तक्रारदाराची फिर्याद होती.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने पोलीस उप आयुक्त यांच्याकडून अहवाल मागविला. २३ डिसेंबर २००२ च्या अहवालात असे नमूद केले होते की, तक्रारदाराच्या मुलीला मानसिक आणि शारिरिकरित्या तिच्या सासरच्या लोकांनी छळले होते; ज्यामुळे तिचा मृत्यू झाला. तिच्या सासरच्या लोकांविरोधात गुन्हा दाखल करून घेण्यात आला. तक्रारदाराने त्याचे समाधान झाल्याची जबानी देऊन सांगितले की त्याची आता कुठलीही तक्रार नाही.

**निर्णयाची तारीख—** २५ फेब्रुवारी २००३.

**निर्णय—** तक्रारदाराच्या जबानी नुसार, आयोगाने प्रकरण बंद करण्याचा निर्णय घेतला.

| | | | |
|---|---|---|---|
| (३५) | तक्रार क्र. | : | ८६५/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २३ एप्रिल २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. अजिम खान हमिद खान |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराने नमूद केले की पोलीस त्याच्या बहिणीच्या लग्नानंतर केवळ पाच महिन्यातच झालेल्या संशयास्पद मृत्यूबाबत चौकशी करत नाहीत. तिच्या सासरच्यांच्या विरोधात तक्रार दाखल करूनसुद्धा त्यांनी कारवाई केली नाही. त्यांनी त्यांच्या मृत बहिणीच्या शवविच्छेदनाच्या अहवालाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता त्यांचा अपमान केला गेला व काहीच उत्तर दिले नाही, व तक्रारदारांस अपमानित केले.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पोलीस अधीक्षक (ग्रामीण) अमरावती यांच्याकडून अहवाल मागविला व त्यांना सुनावणीस बोलाविले. २३ सप्टेंबर २००२ च्या अहवालात असे नमूद केले की संबंधीत मृत्यूची योग्यरित्या चौकशी करण्यात आली व संबंधितांना अटक करण्यात आली. सदर गुन्ह्याची नोंद १० महिने उशिराने झाल्याचे सांगितले व संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध चौकशी चालू आहे, असेही म्हटले आहे.

**निर्णयाची तारीख—** ५ डिसेंबर २००२.

**निर्णय—** संबंधित पोलीस उप निरिक्षकाच्या विरोधात कारवाई केली गेल्याने, प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (३६) | तक्रार क्र. | : | ९१८/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | ६ मे २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. सुनिल नाईक. |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, रायगड |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप—** सागर नाईक नावाच्या इसमाने तक्रारदाराच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला असून, त्यांच्याविरुद्ध पोलीस निरीक्षक श्री. कावले ह्यांनी काही कारवाई केली नाही अशी तक्रार होती.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पोलीस अधीक्षक यांच्याकडून अहवाल मागविला तसेच त्यांना सुनावणीस बोलाविले. २८ ऑगस्ट २००२ च्या अहवालात नमूद केले होते की, त्यासंदर्भात योग्य ती कारवाई केली गेली आहे. श्री. कावले यांना तक्रारीची नोंद करण्यास विलंब केल्याने, कामावरून निलंबित करण्यात आले आहे.

**निर्णयाची तारीख—** ४ डिसेंबर २००२.

**निर्णय—** प्रकरण बंद करण्यात आले, कारण योग्य ती कार्यवाही करण्यात आली होती.

| | | | |
|---|---|---|---|
| (३७) | तक्रार क्र. | : | ५८२/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १० सप्टेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. महादेव लोणकर. |
| | प्रतिवादी | : | जिल्हाधिकारी, यवतमाळ. |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप**— तक्रारदारानुसार संबंधित महसूल अधिकारी, तक्रारदाराच्या नावाची त्याच्या मृत पित्याचा वारस म्हणून नोंद करून घेण्यास नकार देत आहेत. त्यासंदर्भात त्यांनी अनेक विनंतीपत्रे पाठवूनही काम झाले नाही.

**आयोगाने केलेली कारवाई**— आयोगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडून अहवाल मागविला व त्यानंतर सुनावणीस बोलाविले. २९ जानेवारी २००२ ला दिलेल्या अहवालात सांगितले होते की, शेताची मालकी श्री. अहमद अब्दुल अझीझ धमानी यांच्याकडे असून, तक्रारदाराच्या वडिलांना ते भाड्यावर दिले होते. त्यांच्या मृत्यूनंतर, तक्रारदाराने मृत्यूदाखला जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात जमा केला नव्हता. तहसीलदार, कळंबा यांनी सांगितले की, तक्रारदाराने योग्य ती कागदपत्रे सादर केल्यास त्यांच्या नावाची नोंद करण्यात येईल.

**निर्णयाची तारीख**— ७ जानेवारी २००३.

**निर्णय**— तक्रारदाराच्या नावाची नोंद करण्यात आल्याने, प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (३८) | तक्रार क्र. | : | १९०२/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २३ सप्टेंबर २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. के. जयप्रकाश |
| | प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, नवी मुंबई |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप**— तक्रारदाराच्या मुलाचे अपहरण झाले असून पोलीस अधिकाऱ्यांद्वारे त्याचा शोध लागू शकला नाही. पोलिसांकडून केल्या गेलेल्या कार्यवाहीवरून असंतुष्ट असून तक्रारदाराने तपास गुन्हे शाखा, नवी मुंबई ह्यांना सुपूर्द करावा असे निवेदन पोलीस आयुक्तांकडे केले. परंतु पोलीस आयुक्तांने तपास पुनः त्याच अधिकाऱ्यांकडे सोपविला.

**आयोगाने केलेली कारवाई**— आयोगाने पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्याकडून अहवाल मागविला. १४ डिसेंबर २००२ ला आलेल्या अहवालात सांगण्यात आले की, तपासकाम योग्यरित्या केले गेले होते. पण तक्रारदाराच्या तक्रारीनुसार प्रकरण गुन्हे शाखा, नवी मुंबई येथे पुनः तपासासाठी पाठविण्यात आले.

**निर्णयाची तारीख**— ६ मार्च २००३.

**निर्णय**— पोलिसांकडून योग्य ती कारवाई झाल्याने प्रकरण बंद केले गेले.

| | | | |
|---|---|---|---|
| (३९) | तक्रार क्र. | : | ७६४/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १५ ऑक्टोबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्रीमती इंदूताई भोसले |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधिक्षक, बारामती |
| | सदस्यांचे नाव | : | न्या. ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप**— तक्रारदारानुसार राजकीय गुंड व पोलीस तक्रारदार व त्यांच्या कुटूंबीयांविरुद्ध खोट्या तक्रारी दाखल करून त्यांना त्रास देत होते. १४ ऑक्टोबर २००१, रोजी पोलीस निरीक्षक श्री. काकडे व सहा इतर पोलीसांनी त्यांच्या घरावर रात्री धाड घातली आणि त्यांच्या अपंग सुनेशी गैरवर्तन केले. तक्रारदाराला धमकी दिली व त्यांच्या मुलाला मारहाण करून त्याला पकडून पोलीसांच्या गाडीतून घेऊन गेले.

**आयोगाने केलेली कारवाई**— आयोगाने पोलीस अधीक्षक, बारामती यांच्याकडून अहवाल मागविला. २७ ऑगस्ट २००२ च्या अहवालात सांगितले होते की, एक वर्षापूर्वी श्री. काकडे, पोलीस निरीक्षक यांनी फिर्यादीला नीट वागविले नाही. तक्रारदाराने ते प्रकरण गंभीरपणे घेतले आणि एका लेखनिकाला सांगितले, त्या लेखनिकाने तो अर्ज लिहून आयोगाला पाठविला.

तक्रारदाराच्या मुलाने, मालमत्तेच्या संदर्भात गुन्हा केला होता ; त्यामुळे त्याला अटक केली. त्याच अहवालात असेही नमूद केले होते की तक्रारदाराने त्याची काही तक्रार नसल्याची जबानी दिली आहे.

**निर्णयाची तारीख**— ४ फेब्रुवारी २००३.

**निर्णय**— तक्रारदाराची काही तक्रार नसल्याने, प्रकरण बंद केले गेले.

| | | | |
|---|---|---|---|
| (४०) | तक्रार क्र. | : | ९७०/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २९ ऑक्टोबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. पांडुरंग वाघमारे |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधिक्षक, रत्नागिरी व इतर |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमुर्ती. ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराच्या मुलाने महाविद्यालयातील व्याख्यात्याकडून जातीवरून छळ झाल्याने व शाब्दिक अपशब्द वापरल्याने तसेच त्याच्याकडून डि.एड. साठी जास्तीचे १०,०००/- रुपये मागितल्याने आत्महत्या केली. परंतु संबंधित पोलीस ठाण्यात त्याच्या मृत्यूची नोंद अपघाती म्हणून केली गेली.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांच्याकडून अहवाल मागविला तसेच नंतर सुनावणीस बोलाविले. १८ जानेवारी २००२ च्या अहवालात नमुद केले होते की, तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या आधारावर पुढील चौकशी करण्यात आली. संबंधित अध्यापकांस अटक करून त्याच्या विरोधात संबंधित न्यायालयात ''चार्जशीट'' दाखल करण्यात आली.

**निर्णयाची तारीख—** २१ मार्च २००३.

**निर्णय—** विद्यालयातील व्यवस्थापन आणि वरिष्ठ कर्मचारी यांच्या छळवणूकीमुळे होणाऱ्या आत्महत्या यांना आयोगाने 'सामाजिक मुद्दा' म्हणून संबोधले. अशा घटना टाळण्यासाठी आणि वरिष्ठ कर्मचारी यांच्यात 'कोड ऑफ कंडक्ट' चे परिपत्रक पाठविणे योग्य ठरेल असे आयोगाने सांगितले. पोलीस अहवालानुसार दिसून आले की, ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे प्रकरण बंद करण्यात आले, व केलेली कार्यवाही अहवाल शिक्षण विभागाकडून मागविण्यात आला.

**कारवाई—** संबंधित विभागाचा अहवाल अद्याप प्राप्त नाही. तसेच न्यायालयातील प्रलंबित खटल्यात आरोपींची निर्दोष सुटका झाल्याचे आयोगास कळविण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (४१) | तक्रार क्र. | : | १२०५/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | १९ जून २००२ |
| | तक्रारदार | : | श्रीमती लता पवार. |
| | प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, मुंबई |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमुर्ती. ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार मुंबई स्टॉक एक्सचेंज मध्ये काम करत असून त्यांच्या वरिष्ठ आणि कनिष्ठ सहकारी कर्मचाऱ्यांची नेमणुकीस मान्यता मिळाली परंतु तक्रारदाराला मात्र वगळण्यात आले. 'स्टॉक एक्सचेंज, मुंबई' च्या कर्मचारी संघटनेच्या सचिवांने त्यांना एकटे येऊन भेटण्यास सांगितले, ज्याला तक्रारदारने नकार दिल्याने, त्यांच्याविरुद्ध खोटी कागदपत्र गोळा करून त्या मान्यतेसाठी अयोग्य असल्याचे दाखवून दिले. तक्रारदाराने त्यांच्या विरोधात तक्रार केली पण तिच्याकडे दुर्लक्ष केले गेले.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने पोलीस आयुक्त, मुंबई यांचकडून अहवाल मागविला. ७ डिसेंबर २००२ च्या अहवालात दर्शविले होते की तक्रारदाराला त्यांच्या मृत पतीच्या जागेवर नोकरी मिळाली असून, त्यांच्याच कामातील अकार्यक्षमतेमुळे त्यांना कायम केले गेले नाही. सचिवांने त्यांना एकटे येऊन भेटायला सांगणे हा गुन्हा असून, तक्रारदाराने एफ.आय.आर (प्राथमिक माहिती अहवाल) केलेल्या तक्रारीनुसार त्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

**निर्णयाची तारीख—** २८ जानेवारी २००३.

**निर्णय—** पोलीस अहवाल लक्षात घेता, आयोगाने पुढील चौकशीची गरज नसल्याने प्रकरण बंद केले.

| | | | |
|---|---|---|---|
| (४२) | तक्रार क्र. | : | २३९/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | १६ जानेवारी २००२ |
| | तक्रारदार | : | श्रीमती एस. एस. धिकाले. |
| | प्रतिवादी | : | श्री. पी. एस. साळवी, डेप्युटी जनरल मॅनेजर, स्टेट ट्रान्सपोर्ट . |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार, राज्य परिवहन मंडळामधील टंकलेखक असून, श्री. साळवी, डेप्युटी जनरल मॅनेजर, मागील चार वर्षांपासून त्यांचा छळ करीत होते. २५ मे २००१ रोजी साळवी फोनवरून असभ्य भाषा वापरून तक्रारदाराशी बोलले. तक्रारदाराने कारण विचारताच, त्यांनी पेपरवेट फेकून तक्रारदाराला मारले शिवाय २०-२५ लोकांसमोर मंगळसूत्र तोडले. साळवी ५-६ इतर अधिकाऱ्यांच्या बरोबर जाऊन तक्रारदाराविरोधात तक्रार केली त्यामुळे त्यांना देखील पोलीस स्टेशनमध्ये जाणे भाग पडले. संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करून सुद्धा काही फायदा झाला नाही. साळवींनी राजकीय आणि शासकीय दबाव आणून विषय दाबून टाकला.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** पोलीस आयुक्त, झोन-३ यांच्याकडून अहवाल मागविला. २७ जुलै २००२ च्या पोलीस आयुक्तांच्या अहवालात असे म्हटले आहे की, २५ मे २००१ रोजी तक्रारदाराच्या अहवालावरून श्री. साळवी ह्यांच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंदविला गेला. श्री. संतोष डी. माने, सुरक्षा अधिकारी, राज्य परिवहन मंडळ यांनी विभागीय चौकशी केली असता, फोन वरून असभ्य भाषा वापरून बोलल्याचा कुठलाही पुरावा मिळाला नाही. बढतीवरून निर्माण झालेल्या गैरसमजातून हे भांडण उद्‌भवले असे समजून आले विभागीय चौकशी नंतर तक्रारदाराची दुसऱ्या विभागात बदली झाली. त्यानंतर तक्रारदाराने लेखी जबानी दिली की श्री. साळवींकडून त्यांना २५ मे २००१ पश्चात काही उपद्रव झाला नाही.

**निर्णयाची तारीख—** २७ जुलै २००२.

**निर्णय—** पोलीस उप आयुक्तांच्या अहवालानुसार प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (४३) | तक्रार क्र. | : | २१२१/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | ७ नोव्हेंबर २००२ |
| | तक्रारदार | : | श्रीमती विमल शिंगारे . |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, बुलढाणा. |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस. |

**तक्रारीचे स्वरूप—** झोपडपट्टीतील गुंड श्री. भागाजी धांनजी डोंग्रे तक्रारदाराचा मानसिक व शारिरीक छळ करीत असल्याची, तक्रार तक्रारदाराने केली. तक्रारदाराने पोलिस खात्याच्या अधिक्षकांद्वारा जिल्हाधिकाऱ्यांना त्या गुंडाला हद्दपार करण्याची विनंती केली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** पोलीस अधिक्षक, बुलढाणा ह्यांच्याकडून आयोगाने अहवाल मागविला. २२ जानेवारीच्या अहवालात नमुद केले होते की, श्री. डोंगरे यांना दोन वर्षांसाठी हद्दपार केले गेले आहे. त्यामुळे तक्रारदाराचे समाधान झाले आहे.

**निर्णयाची तारीख—** २५ फेब्रुवारी २००३.

**निर्णय—** पोलीस अहवाल लक्षात घेता प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (४४) | तक्रार क्र. | : | ३६६/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | ७ जुलै २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. जे. व्ही. निकोसे. |
| | प्रतिवादी | : | मुख्य अभियंता पी. डब्लू. डी |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. सी. एल्. थूल. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदारानुसार महाराष्ट्र शासनातर्फे त्यांचा छळ होत होता. ते पी. डब्लु. डी. मध्ये कार्यकारी अभियंता असून, ते भंडारा येथून यवतमाळ जिल्हा परिषदेत त्यांची बदली करण्यात आली. त्याबद्दल त्यांनी मुंबई उच्च न्यायालय, नागपूर विभाग, येथे तक्रार केली. न्यायालयाने तक्रारदाराच्या बाजूने निर्णय दिला. महाराष्ट्र शासनाने न्यायालयीन आदेशाकडे दुर्लक्ष करून अवमान केला व उलट त्यांच्या विरुद्ध खोटी चार्ज शीट दाखल केली, १९९३ पासून त्यांना निलंबित करण्यात आले. १९९८ मध्ये त्यांना परत बोलावून, विभागीय चौकशी सुरू केली परंतु त्यांच्या बदलीचा मुद्दा वगळला गेला. ह्यामुळे तक्रारदाराचे भरून न निघण्यासारखे नुकसान झाले. ८-९ वर्षांपासून प्रलंबित चौकशी बंद करून निलबनाच्या कालावधीतील सेवा नियमित करून सेवा जेष्ठतेप्रमाणे पदोन्नती व्हावी अशी विनंती तक्रारदाराने केली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने मुख्य कार्यकारी अभियंता ह्यांच्याकडून अहवाल मागविला. १४ डिसेंबर २००१ च्या विभागीय अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालात सांगण्यात आले की, शासनाने निर्णय घेतला आहे की, श्री. निकोसे बढतीस पात्र नाहीत परंतु त्यांना तात्पुरती बढती देण्याचा निर्णय घेतला होता. १५ फेब्रुवारी २००३ रोजी तक्रारदाराला सुनावणीस नागपूरला बोलविण्यात आले.

**निर्णयाची तारीख**— २५ फेब्रुवारी २००३.

**निर्णय**— तक्रारदाराची अभियंता (सिव्हिल) ह्या पदावर नेमणुक मिळाल्याने, प्रकरण बंद केले गेले. सेवा जेष्ठतेनुसार मिळणारे फायदे आणि विभागीय चौकशीच्या प्रकरणात तक्रारदार नव्याने अर्ज करू शकतो.

| | | | |
|---|---|---|---|
| (४५) | तक्रार क्र. | : | ६१७/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १६ जुलै २००१ |
| | तक्रारदार | : | श्रीमती स्वप्ना सागर. |
| | प्रतिवादी | : | पोलीस उप आयुक्त, उल्हासनगर |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस. |

**तक्रारीचे स्वरूप**— तक्रारदारानुसार, त्यांना, त्यांच्या पतीला, आणि मुलीचा तिच्या सासऱ्यांकडून छळ होत होता. तिने त्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार केली, पण त्यांच्याच विरोधात पोलिसांनी कारवाई केली. पोलीसांनी त्यांच्या सासऱ्याची बाजू घेऊन त्यांना धमकी दिली, खोटया चोरीच्या आरोपात त्यांना गुंतविण्याची धमकी दिली. तक्रारदार व त्यांचे कुटुंब प्रथम वेगळे राहत असून सासरे एकटे असल्यामुळे त्यांच्या बरोबर रहावयास आले.

**आयोगाने केलेली कार्यवाही**— आयोगाने पोलीस उप आयुक्त ह्यांच्याकडून अहवाल मागविला. त्या अहवालात सांगितले होते, तक्रारदार आणि त्यांचे पती २० वर्षांपासून वेगळे रहात होते. नुकतेच ते तक्रारदाराच्या सासऱ्यांकडे रहायला आले. तक्रारदाराच्या सासऱ्यांनीच त्यांचा त्यांच्या मुलाकडून छळ होत असल्याची तक्रार केली. त्याआधारे तक्रारदाराच्या पतीला अटक करून नंतर 'जमिनावर' सोडण्यात आले. अहवालात सांगितले की, ह्या संबंधित केली गेलेली कारवाई योग्य व जरूरीची आहे.

आयोगाने सुनावणीस २२ जुलै २००२ ला बोलाविले.

**निर्णयाची तारीख**— ६ ऑगस्ट २००२.

**निर्णय**— तक्रारदाराच्या इच्छेनुसार प्रकरण बंद करण्यात आले.

**ध्वनी प्रदुषण**

| | | | |
|---|---|---|---|
| (४६) | तक्रार क्र. | : | २९/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १८ एप्रिल २००१ |
| | तक्रारदार | : | डॉ. महेश बाल्डवा, मुंबई . |
| | प्रतिवादी | : | पोलीस उप आयुक्त, बोरिवली (प), मुंबई. |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस. |

**तक्रारीचे स्वरूप**— रेड रोज बार व हॉटेलकडून निर्माण केल्या जात असलेल्या ध्वनी प्रदूषणाविरुद्ध तक्रारदाराने बोरिवली पोलीस ठाण्याकडे तक्रार करूनही सदर तक्रारीवर पुढे कारवाई न होणेबाबत तक्रारदाराने आयोगाकडे फिर्याद केली. तक्रारदार हे सुमन नगर नं. ३, को-ऑपरेटिव्ह हौसिंग सौसायटीचे अध्यक्ष होते. सदर हॉटेलात मा. उच्च न्यायालयाने घातलेले दारू, ध्वनी प्रदुषण इ. बाबतची बंधने/नियम पाळले जात नाहीत अशी तक्रार होती. ह्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील रहिवाश्यांना ध्वनी प्रदुषणाचा त्रास होतो.

**आयोगाने केलेली कार्यवाही**— आयोगाने संबधित पोलीस उप आयुक्त ह्यांच्याकडून अहवाल मागविला. १४ सप्टेंबर २००१ च्या अहवालात असे नमूद केले होते की, बार आणि हॉटेल हे उच्च न्यायालयाच्या वेळेच्या व इतर बंधनाच्या अखत्यारित येत नाही, मात्र पुढे कायदा उल्लंघनाच्या तक्रारींची दखल घेतली जाईल ह्याची खात्री पोलीस उप आयुक्त ह्यांनी दिली.

**निर्णयाची तारीख**— ५ जून २००२.

**निर्णय**— पोलीस उप आयुक्त, बोरिवली ह्यांच्या अहवालाच्या आधारे प्रकरण बंद करण्यात आले.

**उपद्रव**

| | | | |
|---|---|---|---|
| (४७) | तक्रार क्र. | : | २७७/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २१ जानेवारी २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. श्रीधर कदम |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधिक्षक, रत्नागिरी |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमुर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप**— तक्रारदारानुसार चिपळूणच्या रहिवाश्यांनी त्यांच्या विरोधात पोलीसांत खोट्या तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यांनी तक्रारदाराला धमक्या दिल्या, छळ केला, आणि उपद्रव निर्माण केला. पोलीस निरिक्षक आणि हवालदारांनी ह्या सर्व लोकांना पाठींबा दिला.

**आयोगाने केलेली कारवाई**— आयोगाने पोलीस अधीक्षक, रत्नागिरी ह्यांच्याकडून अहवाल मागविला. १७ जून २००२ रोजी दिलेल्या अहवालात दर्शविलेले, दोन्ही पक्षांनी एकमेकाविरोधात तक्रारी दाखल केल्या होत्या ; व त्या संबंधित न्यायालयात प्रलंबित आहेत. अहवालावरून असे दिसून आले की, तक्रारदाराला वाटले की, त्याची बदली पोलिसांनी दिलेल्या अहवालामुळे झाली, त्यामुळे त्याने पोलिसांविरूद्ध तक्रार केली.

**निर्णयाची तारीख**— १७ मार्च २००३.

**निर्णय**— अहवालावरून आयोगाची खात्री पटली की ह्या मुकदम्यात पुढील कारवाईची गरज नाही, त्यामुळे खटला बंद करण्यात आला.

**निवृत्ती पश्चात**

| | | | |
|---|---|---|---|
| (४८) | तक्रार क्र. | : | १९६/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २ जून २००१ |
| | तक्रारदार | : | (मेसर्स. ओरिएंट इंजिनिअरिंग) चे जी. जी. सावंत, आणि इतर कर्मचारी. |
| | प्रतिवादी | : | रीजनल प्रॉव्हिडंट फंड कमिशनर, बांद्रा, मुंबई |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमुर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप**— तक्रारदारानुसार रीजनल प्रॉव्हिडंट फंड कमिशनर आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी, तक्रारदारांनी दिलेल्या भविष्य निर्वाह निधी परत मिळण्यासाठी केलेल्या अर्जांची दखल घेतली नाही. जरी त्यांच्या पगारातून भविष्य निर्वाह निधी कापला गेला होता, तरी भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात तो जमा झाला नाही.

**आयोगाने केलेली कारवाई**— आयोगाने रीजनल प्रॉव्हिडंट फंड कमिशनर, बांद्रा, मुंबई यांच्या कडून अहवाल मागविला व त्यानंतर सुनावणीस बोलावले. १८ फेब्रुवारी २००२ च्या अहवालात सांगितले होते की , त्यांच्या कार्यालयातून आवश्यक कारवाई करण्यात आली असून, वर उल्लेखलेल्या मेसर्स. ओरिएंट इंजिनिअरिंग विरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. सहाय्यक प्रॉव्हिडंट फंड कमिशनरने त्वरीत कारवाई करण्याची हमी आयोगांला दिली.

**निर्णयाची तारीख**— २९ ऑगस्ट २००२.

**निर्णय**— संबंधित खात्याने दिलेल्या हमीमुळे आयोगाने ते प्रकरण पुढील कारवाईसाठी संबंधित खात्याकडे पाठविले व पुढील चौकशीची गरज नसल्याची नोंद केली.

**केलेली कारवाई**— अहवाल अद्याप प्राप्त नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| (४९) | तक्रार क्र. | : | १०४१/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | ३ डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. विनायक सुर्यवंशी. |
| | प्रतिवादी | : | विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे. |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराने तक्रार केली की त्यांना सक्तीची निवृत्ती घेण्यास भाग पाडले व स्वतःची बाजू मांडण्याची संधी न देता त्यांच्या विरोधात एकतर्फी विभागीय चौकशी केली. तक्रारदाराने नमूद केले की त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत आपले काम चोख केले व ३१ ऑक्टोबर २००० रोजी ते निवृत्त होणार होते पण तरी हुकूम रद्द करून, त्यांना सक्तीची निवृत्ती दिली.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने विभागीय आयुक्त, पुणे ह्यांच्याकडून अहवाल मागविला व त्यानुसार २२ मे २००२ च्या अहवालात असे सांगितले होते की, तक्रारदाराच्या विरोधात केल्या गेलेल्या विभागीय चौकशीला योग्य कारणे होती. तक्रारदाराला त्याची बाजू मांडायला दिली होती, तसेच जरी त्यांना सक्तीची निवृत्ती दिली होती, तरी त्यांच्या कामाकडे पाहता त्यांना भविष्यनिर्वाह निधी, इत्यादी निवृत्तीनंतर मिळणारे फायदे दिले होते.

**निर्णयाची तारीख—** २८ ऑक्टोबर २००२.

**निर्णय—** अहवालावरून दिसून आले की प्रकरण नोकरीशी संबंधीत आहे व त्यामुळे शासनाकडे शिफारस करून ते प्रकरण बंद करण्यात आले.

**शिक्षणाचा हक्क**

(५०)

| | | |
|---|---|---|
| तक्रार क्र. | : | ९८१/२००१ |
| तक्रारीची तारीख | : | २१ नोव्हेंबर २००१ |
| तक्रारदार | : | डॉ. मधुकर गुंबले. |
| प्रतिवादी | : | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती. |
| सदस्याचे नाव | : | श्री. एम. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप—** मेळघाट - आदिवासी भागांतील मुलांना सरकारी योजनांर्तगत, आदिवासी भागांतील शाळांत प्रवेश देण्यास नकार दिला, अशी तक्रारदाराने तक्रार केली. तक्रारदाराने प्रवेशासंबंधी विनंती पत्रक संबंधित उच्च अधिकाऱ्यांना पाठविले. पण त्यांना शाळेत प्रवेश मिळाला नाही.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी ह्यांच्याकडून अहवाल मागविला व त्यानंतर सुनावणीस बोलाविले. २२ एप्रिल २००२ च्या अहवालात मुलांना योजनेनुसार प्रवेश मिळून ते शिक्षण घेत आहेत असे नमूद करण्यात आले.

**निर्णयाची तारीख—** ९ सप्टेंबर २००२.

**निर्णय—** आयोगाचे अहवालामुळे समाधान झाल्याने, मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ कलम १७ (आय) (बी) च्या अंतर्गत प्रकरण बंद करण्यात आले. आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना आदिवासी भागांची पहाणी करायला सांगितली, व जिथे गरज आहे तेथे शाळा चालू केल्या जाव्यात, ज्यामुळे सर्वांना घटनेद्वारे प्रदान केलेल्या हक्कांतर्गत शिक्षण मिळेल.

**पुढील कारवाई—** २४ जून २००३ रोजी आयोगाला अमरावती जिल्हा परिषदेच्या शिक्षण अधिकाऱ्यांनी पहाणी केल्याचे आणि गरजेनुसार शाळा सुरू केल्याचे नमूद करणारे पत्रक आले.

**समानतेचा हक्क**

(५१)

| | | |
|---|---|---|
| तक्रार क्र. | : | ६४६/०१ |
| तक्रारीची तारीख | : | १४ डिसेंबर २००१ |
| तक्रारदार | : | श्री. रमेश फोंडगे. |
| प्रतिवादी | : | महानगरपालिका आयुक्त, पुणे. |
| सदस्याचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त). |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराने नियमित निवृत्ती वेतन मिळण्यासाठी नोकरीत अजून एक वर्ष वाढवून देण्यासाठी केलेली विनंती स्टँडिंग कमिटीद्वारा कारणे न देता फेटाळून लावण्यात आली. इतर वेळी, स्टँडिंग कमिटीद्वारा पुष्कळदा एक वर्ष वाढवून देऊन निवृत्ती वेतन नियमित केले गेले पण तक्रारदाराचे प्रकरण व्यवस्थितपणे हाताळले गेले नाही, अशा स्वरूपाची तक्रार तक्रारदाराने केली.

**आयोगाने केलेली कार्यवाही—** आयोगाने नगरपालिका आयुक्तांकडून अहवाल मागविला व त्यानंतर सुनावणीस बोलाविले. ह्या अहवालानुसार निवृत्ती वेतन, अधिनियम-६ नुसार, कर्मचाऱ्याची नोकरी नियमित निवृत्तिवेतनासाठी वर्षभरासाठी वाढवायची हे पूर्णपणे स्टँडींग कमिटीच्या विवेकाधीन होते. कालावधी वाढवून देणे किंवा न देणे ह्या निर्णयासाठी समिती पूर्णपणे स्वतंत्र असून, त्यासाठी कारणे देण्यास समिती बांधील नाही. तक्रारदाराच्या कार्यालयातील कामाचा आढावा घेताना आढळून आले की त्यांच्या विरोधात विभागीय चौकशी केली असता ते दोषी असल्याचे समजले.

**निर्णयाची तारीख—** ८ जानेवारी २००३.

**निर्णय—** निवृत्त वेतन हा कर्मचाऱ्यांच्या कार्याचा सेवायोजकाद्वारे केलेला सन्मान असतो, असे मत आयोगाने व्यक्त केले, स्टँडींग कमिटी, कुठलेही कारण न देता आदेश करीत असल्याने त्यांच्याकडून 'नॅचरल लॉ' च्या मूलतत्त्वांचा भंग होत असल्याचे आयोगाला दिसून आले. आयोगाने तक्रारदाराचे प्रकरण पुन्हा तपासून पहाण्याची सूचना दिली. निवृत्ती वेतन अधिनियमांमधील अधिनियम ६ लक्षात घेता आयोगाने तक्रारदारास स्टँडींग कमिटीचा निर्णय इतर योग्य प्रांगणासमोर (मंच) मांडण्याचा सल्ला दिला.

| | | | |
|---|---|---|---|
| (५२) | तक्रार क्र. | : | ६९४/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २ ऑक्टोबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. अविनाश गायकवाड |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण) |
| | सदस्याचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदाराने जातीच्या आधारे त्यांच्या कुटुंबियांना गावाने बहिष्कृत केले, दुकानदार त्यांना गरजेच्या वस्तू विकत नव्हते, त्यांना पिठाच्या गिरणीवर येण्यापासून थांबविले गेले अशी तक्रार केली, पारधी समाजातील व्यक्ती असुरक्षित आहेत, असे तक्रारदाराचे मत होते.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण) यांजकडून अहवाल मागविला व त्यानंतर त्यांना सुनावणीस बोलाविले. त्यांच्याद्वारे पाठविलेल्या अहवालात नमूद करण्यात आले की, पारधी समाजातील व्यक्तीशी दुष्टाव्याने वागणाऱ्या गावातील लोकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे; त्यामुळे नित्य आवश्यकतेच्या वस्तूबाबत आता काही त्रास नसून गाव आता शांत आहे. तरीसुद्धा पोलीसांनी दोन्ही पक्षांच्या हालचालीवर लक्ष ठेवले आहे.

**निर्णयाची तारीख—** १३ सप्टेंबर २००२.

**निर्णय—** गावात शांतता आहे असे समजल्यावर, ह्या प्रकरणात पुढील कारवाईची गरज नसल्याने, ते बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (५३) | तक्रार क्र. | : | १५८/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | ९ जानेवारी २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. कृष्णा साळवी. |
| | प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, पुणे |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमुर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार, संतशिरोमणी गोरोबाकाका ह्या नोंदणीकृत समाजसेवी संस्थेचे सदस्य असून, संस्थेने त्यांना व इतर काही सदस्यांना संस्थेद्वारा बांधल्या गेलेल्या मंदिराच्या बांधकामाचा अहवाल मागितल्यामुळे गेल्या ६-७ वर्षांपासून बहिष्कृत केले.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पुणे पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागविला. त्या अहवालात नमूद केले होते की, पोलीसांनी त्या संस्थेच्या प्रमुखांना आणि संबंधित सदस्यांना योग्य ती समज दिली आहे. त्यांच्यामधील मतभेद आता निवळत चालले आहेत. नंतर तक्रारदाराला काहीही त्रास झाला नसून, त्यांची आता तक्रार नाही.

**निर्णयाची तारीख—** २२ ऑगस्ट २००२.

**निर्णय—** अहवालाने समाधान झाल्याने प्रकरण बंद करण्यात आले.

**उपजिविकेचा हक्क**

| | | | |
|---|---|---|---|
| (५४) | तक्रार क्र. | : | ६३६/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | ३० ऑगस्ट २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. काझी सैय्यद सलाहुद्दीन |
| | प्रतिवादी | : | मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** वनसंरक्षक व मुख्य वनसंरक्षक ह्यांचे आदेश असुनही उप वनसंरक्षक तक्रारदाराच्या सॉ मिलचा परवाना, जमीनमालकाचे ना हरकत पत्र नसल्याने वाढवून देत नसल्याची तक्रार होती. तसेच त्यांनी तक्रारदाराची यंत्रसामग्री बंद करण्यास भाग पाडले. तक्रारदाराने मुख्य वनसंरक्षक आणि वनसंरक्षककांकडून परवानगी घेतली होती तसेच, हरकत नसल्याचे प्रमाणपत्र सारखे देण्याची जरुरत नाही. तरीसुद्धा तक्रारदाराने मराठवाडा वक्फ बोर्डाकडे त्याची मागणी केले होती परंतु ती नाकारण्यात आली.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने मुख्य वनसंरक्षक आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला व नंतर दोन्ही पक्षांना सुनावणीस बोलाविले. २६ नोव्हेंबर २००१ च्या अहवालात सांगितले होते की, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, संरक्षित जंगलाच्या १० किलोमिटर परिघाच्या आत सॉ मिल चालविण्यास परवानगी नाही. त्यामुळे तक्रारदाराला परवानगी देण्यात आली नाही.

**निर्णयाची तारीख—** २० डिसेंबर २००२.

**निर्णय—** आयोगाने उप वनसंरक्षक, औरंगाबाद, ह्यांना तक्रारदाराचा परवाना वाढवून द्यावा, अशी सूचना करून प्रकरण बंद केले.

| | | | |
|---|---|---|---|
| (५५) | तक्रार क्र. | : | १०९/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | १० डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. कृष्णदास रिझवानी. |
| | प्रतिवादी | : | आर. टी. ओ., नांदेड. |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदारानुसार, आर.टी.ओ.मध्ये काम करणारे श्री. शेळके यांनी तक्रारदाराला, त्याच्या प्रवासी बससाठी वाहन सुरक्षिततेचे प्रमाणपत्र देण्यास नाकारले.त्यांनी नियमितपणे कर भरला होता आणि ते वाहन सुरक्षित होते तरी त्याची बस बेकायदेशीररीत्या ताब्यात घेतली.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने आर.टी.ओ. नांदेड ह्यांच्याकडून अहवाल मागविला व त्यानंतर दोन्ही पक्षांना सुनावणीस बोलाविले. ११ एप्रिल २००२ च्या अहवालात सांगण्यात आले की, तक्रारदाराने कर भरला नव्हता. तसेच बस मानवी वाहतुकीसाठी योग्य नव्हती व सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. सुनावणीदरम्यान असे ठरविण्यात आले की तक्रारदाराने भविष्यात नियमित कर भरल्यास त्याला वाहतुकीची परवानगी देण्यात येईल.

**निर्णयाची तारीख—** २० डिसेंबर २००२.

**निर्णय—** दोन्ही पक्षांमधील करारामुळे प्रकरण बंद करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| (५६) | तक्रार क्र. | : | ७४०/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १५ ऑगस्ट २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. अशोक वाघमारे. |
| | प्रतिवादी | : | जिल्हाधिकारी, नांदेड. |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** तक्रारदार एक भूमीहीन शेतमजूर होते. त्यांच्या तक्रारीत नमूद केले की, त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे, गायरानाची जमीन—सर्व्हे क्रमांक ४८ नुसार संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारदाराला दिली नसून १९८३-८४ पासुन तक्रारदाराचा ह्या जमिनीवर मालकी हक्क होता. १९८५-८६ आणि १९९०-९१ ह्या साली शासनाने गायरानाच्या जमिनींचे नियमन केले, परंतु तक्रारदाराने केलेल्या तक्रारी सर्व अधिकाऱ्यांकडून डावलल्या गेल्या.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्याकडून अहवाल मागविला. १९ डिसेंबर २००२ च्या अहवालात नमूद केले होते की, ह्या जमिनीच्या मालकी हक्काचा ताबा तक्रारदाराकडे १४ एप्रिल १९९० च्या नंतर असल्यामुळे त्यांचा मालकी हक्क शासन निर्णयानुसार संरक्षिला गेला नाही. त्यामुळे त्यांचे अर्ज संबंधित अधिकाऱ्यांकडून नाकारले गेले. अहवालात सुचविले गेले होते की, तक्रारदार ह्या निर्णयाने समाधानी नसल्यास, औरंगाबाद विभागीय आयुक्त यांच्याकडे पुनःतपासणीसाठी तक्रार-अर्ज करू शकतात.

**निर्णयाची तारीख—** २० डिसेंबर २००२.

**निर्णय—** तक्रारदाराचा त्या जमिनीवर असलेला मालकी हक्काचा कुठलाच लिखित पुरावा नसल्याने आयोगाने नांदेड जिल्हाधिकारी यांना १९७८ पासून तक्रारदाराचा त्या जमिनीवर असलेला हक्काबाबत तपास करण्यास सांगितले. जर तक्रारदाराचा त्या जमिनीवर हक्क आढळून आला, तर शासन निर्णयानुसार तक्रारदाराचा जबाब विचारात घेतला जाऊन त्यावर कारवाई केली जाऊन त्याचा अहवाल आयोगाला दिला जावा. ह्या सुचना देऊन ते प्रकरण बंद करण्यात आले.

**केलेली कारवाई—** अहवाल अद्याप प्राप्त नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| (५७) | तक्रार क्र. | : | ७४२/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | ४ एप्रिल २००२ |
| | तक्रारदार | : | डॉ. ओमप्रकाश एन्. दुबे. |
| | प्रतिवादी | : | मुख्य अधिकारी, नगर परिषद, नालासोपारा, वसई, ठाणे. |
| | सदस्यांचे नाव | : | डॉ. व्ही. एस. चिटणीस. |

**तक्रारीचे स्वरूप—** नालासोपारा सेवा समितीच्या अध्यक्षांनी तक्रार केली की २० एप्रिल २००१ रोजी नगर परिषद, नालासोपारा येथील मुख्य अधिकारी यांनी, उड्डाण पुलाच्या बांधणीनंतर, फेरी विक्रेत्यांना पुलाखाली योग्य दरात जागा देण्याचे आश्वासन दिले होते. सदर आश्वासन तक्रारदार व फेरीवाले जागेकरिता आमरण उपोषणास बसले असता देण्यात आले होते, परंतु त्यावर पुढील कार्यवाही केली गेली नाही.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने मुख्य अधिकारी, नगर परिषद, नालासोपारा यांजकडून अहवाल मागविला. ३१ डिसेंबर २००२ च्या अहवालात नमूद केले होते की नालासोपारा येथे फेरीवाल्या विक्रेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे व त्यांना आज्ञापत्र देण्याचे काम चालू आहे. परंतु पुलाखालील मर्यादित जागा, अरूंद पादचारी पथ तसेच वाहतूक आणि पादचारी लक्षात घेता सर्व विक्रेत्यांना जागा देणे शक्य होणार नाही.

**निर्णयाची तारीख—** ५ जानेवारी २००३.

**निर्णय—**मुख्य अधिकारी, नगर परिषद, नालासोपारा यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रकरण ५ जानेवारी २००३ रोजी बंद करण्यात आले.

**राईट ऑफ प्रेस**

| | | | |
|---|---|---|---|
| (५८) | तक्रार क्र. | : | ९८५/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | १९ ऑक्टोबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. बाळासाहेब अहीवळे |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, बारामती |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप—** "जनवारस' चे कार्यकारी संपादक ह्यांने पोलीस हवालदार श्री. सुरेश नलावडे ह्यांच्या विरुद्ध तक्रार केली. एका बारमध्ये दोन व्यक्तींची छायाचित्रे काढत असताना श्री. नलावडे ह्यांने तक्रारदाराचा कॅमेरा हिसकावून घेऊन तोडून टाकला व तक्रारदाराच्या हक्काचा भंग केला अशी तक्रार केली.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने पोलीस अधीक्षक, बारामती ह्यांच्याकडून अहवाल मागविला. ८ एप्रिल २००२ च्या अहवालात असा कुठलाही प्रसंग घडला नसल्याचे नमूद केले होते. बारामती शहर पोलीसांनुसार, तक्रारदार गुन्हेगार असून अहवालात नमूद केले होते की, तक्रारदाराने पोलीस इन्स्पेक्टरांना जबानी दिली की हवालदार श्री. सुरेश नलावडेंविरुद्ध त्यांची कोणतीही तक्रार नाही.

**निर्णयाची तारीख—** १४ ऑगस्ट २००२.

**निर्णय—** पोलीसांकडून दिल्या गेलेल्या जबाबानुसार, प्रकरण बंद करण्यात आले.

**शारीरिकरित्या अकार्यक्षम असलेल्या व्यक्तींचे अधिकार**

| | | | |
|---|---|---|---|
| (५९) | तक्रार क्र. | : | ४६७/२००२ |
| | तक्रारीची तारीख | : | २५ फेब्रुवारी २००२ |
| | तक्रारदार | : | श्री. कृष्णा चव्हाण |
| | प्रतिवादी | : | मुख्यमंत्री ह्यांचे उप सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई. |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त). |

**तक्रारीचे स्वरूप—** मुख्यमंत्री ह्यांचे उप सचिव, महाराष्ट्र ह्यांनी जाणूनबुजून तक्रारदारांस अपंगासाठीच्या राखीव कोट्यामधून तळमजल्यावरील रहाण्याची जागा वाटून दिली नाही. अशी तक्रारदाराची फिर्याद होती.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने मुख्यमंत्री ह्यांचे उप सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून अहवाल मागविला व त्यानंतर त्यांना सुनावणीस बोलाविले.

**निर्णयाची तारीख—** ७ ऑक्टोबर २००२.

**निर्णय—** आयोगाला, तक्रारदाराकडून पत्र मिळाले ज्यात असे नमूद केले होते की, अधिकाऱ्यांनी दिलेली जागा त्यांना मान्य असून तक्रार मागे घेतली आहे, सदर पत्राच्या आधारे प्रकरण बंद करण्यात आले.

**राईट ऑफ रेसिडन्स— (वस्ती करून रहाण्याचा अधिकार)**

| | | | |
|---|---|---|---|
| (६०) | तक्रार क्र. | : | ८६७/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | २४ ऑक्टोबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. रामेश्वर पलोटी आणि इतर. |
| | प्रतिवादी | : | डेप्युटी कंट्रोलर, इनक्रोचमेंट अँड अन्ऑथोराईज्ड स्ट्रक्चर, मुंबई. |
| | सदस्यांचे नाव | : | श्री. एम्. आर. पाटील. |

**तक्रारीचे स्वरूप—** जवळपास सात तक्रारदारांनी आयोगाकडे तक्रार केली की, त्यांच्या संरक्षित झोपड्या बेकायदेशीरपणे तोडण्यात आल्या घरे पाडण्यापुर्वी त्यांना घरातील वस्तू हालविण्यास देखील वेळ दिला नाही. तक्रारदारांनी त्यांच्या शासनाच्या योजनांद्वारे संरक्षित असलेल्या झोपड्या तोडल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.

**आयोगाने केलेली कारवाई—** आयोगाने डेप्युटी कंट्रोलर, इनक्रोचमेंट अँड अन्ऑथोराईज्ड स्ट्रक्चर, मुंबई, तहसीलदार (अतिक्रमण) मुंबई आणि नायब तहसीलदार, मुंबई व इतरांकडून अहवाल मागविला तसेच नंतर सुनावणीस बोलाविले. ८ जानेवारी २००२ च्या अहवालात सांगितले की, तहसीलदार (अतिक्रमण) यांच्याकडून दिल्या गेलेल्या आज्ञेनुसार झोपड्या पाडण्यात आल्या पण संरक्षित झोपड्यांना त्यातून वगळण्यात आल्या. १० जानेवारी २००२ च्या नायब तहसीलदार, मुंबई यांच्या अहवालात सांगितले की, एकूण २५२ झोपड्यांपैकी २९ संरक्षित होत्या. त्यापैकी २२ कोठल्याही सरकारी यंत्रणेद्वारा तोडण्यात आल्या नाही. उर्वरित ७ झोपड्या पुन्हा बांधण्यास परवानगी दिली होती. प्रतिवादी क्र. ४ श्री. एम्. वाय्. अबसूर यांनी सुपूर्द केलेल्या अहवालातून दिसून आले की, तक्रारदारांनी दिवाणी न्यायालयातर्फे त्यांना नोटीसेस् पाठविल्या होत्या.

**निर्णयाची तारीख—** १५ मार्च २००३.

**निर्णय—** संबंधित प्रतिवादींच्या अहवालावरून स्पष्ट झाले की, संरक्षित झोपड्यासुद्धा तोडल्या गेल्या आहेत. आयोगाने जिल्हाधिकारी, मुंबई सबर्बन डिस्ट्रिक्ट ह्यांना पात्र झोपडीधारकांना शासनाच्या धोरणाप्रमाणे योग्य संरक्षण देण्याचा आदेश केला ; तसेच पर्यायी जागा दिल्या शिवाय संरक्षित झोपड्या पाडू नये असेही सुचविले. पर्यायी जागा देणे ही पूर्णपणे जिल्हाधिकाऱ्यांची जबाबदारी आहे असे आयोगाने म्हटले आहे. तक्रारदारांची आर्थिक नुकसानभरपाईची मागणी पुराव्याअभावी आयोगाद्वारे तपासता आली नाही.

**पोलीसांकडून धमक्या**

| | | | |
|---|---|---|---|
| (६१) | तक्रार क्र. | : | १०३१/२००१ |
| | तक्रारीची तारीख | : | ३ डिसेंबर २००१ |
| | तक्रारदार | : | श्री. जितेंद्र कोठारी. |
| | प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) |
| | सदस्यांचे नाव | : | न्यायमूर्ती ए. डी. माने (निवृत्त) |

**तक्रारीचे स्वरूप**— पोलीस हवालदार श्री. व्ही. पी. शिरसाठ ह्यांने तक्रारदारास धमकी देवून त्याच्याविरुद्ध ७-८ खोट्या तक्रारी (केसे्स) दाखल केल्याची तक्रारदाराने आयोगाकडे फिर्याद केली.

**आयोगाने केलेली कारवाई**— आयोगाने पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांच्याकडून अहवाल मागविला. ३१ ऑगस्ट २००२ रोजी दिलेल्या अहवालात नमूद केले होते की, तक्रारदाराला पोलीस ठाण्यात बोलवूनही तो येऊ न शकल्याने त्यांचा भाऊ हजर राहिला. संबंधित पोलीस हवालदाराकडून लेखी जबानी घेण्यात आली, तसेच तक्रारदाराच्या भावाने पोलीसांने केलेल्या कार्यवाहीशी संतुष्ट असल्याची जबानी देखील दिली.

**निर्णयाची तारीख**— ३१ ऑगस्ट २००२.

**निर्णय**— संबंधित हवालदाराविरुद्ध केलेल्या कारवाईस मद्देनजर ठेवून पुढील चौकशीची गरज नसल्याचे नमूद करून, आयोगाने प्रकरण बंद केले.

## जोडपत्र ' अ '

## अटक झालेल्या व्यक्तींचे हक्क

## सर्वोच्च न्यायालयाची मागर्दशक तत्वे.

डी. के. बसुच्या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने अटक होणाऱ्या व्यक्तीच्या हक्कांच्या संदर्भात काही नियम घालून दिले आहे, ते खालीलप्रमाणे.—

१. पोलीस अधिकाऱ्यांनी अटक करताना व चौकशी करताना त्यांचे नाव व दर्जा दाखवणारा बॅच स्पष्टपणे व अचूकपणे दिसेल असा लावला पाहिजे. अटक झालेल्या व्यक्तीची तपासणी करणाऱ्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांची नोंद नोंदवहीत असली पाहिजे.

२. अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने अटक होणाऱ्या व्यक्तीच्या नावे स्पष्ट लेखी आदेश अटक करतेवेळी नेला पाहिजे. या आदेशावर किमान एका साक्षीदाराची (जो त्या व्यक्तीचा नातेवाईक किंवा त्या भागातील माननीय व्यक्ती असेल) सही घेतली पाहिजे. या आदेशावर अटक होणाऱ्या व्यक्तीने त्या दिवसाची तारीख व अटकेची वेळ टाकून सही केली पाहिजे.

३. अटक झालेली व्यक्ती, कोठडीत डांबून ठेवलेली व्यक्ती किंवा चौकशी केंद्रात (Interrogation centre) किंवा पोलीस लॉकअपमध्ये असलेल्या व्यक्तीचा किमान एक मित्र, नातेवाईक किंवा अशी व्यक्ती जी अटक झालेल्या व्यक्तीस ओळखते व तिच्या कल्याणाची अपेक्षा बाळगते अशा व्यक्तीस अटक झालेल्या व्यक्तीचा ठावठिकाणा ताबडतोब कळविला गेला पाहिजे. अटकेच्या आदेशावर सही करणारा साक्षीदार मित्र किंवा कुटुंबिय असेल तर हे आवश्यक नाही.

४. जर अटक झालेल्या एखाद्या व्यक्तीचे नातेवाईक किंवा मित्रमंडळी शहराच्या किंवा जिल्ह्याच्या बाहेर राहत असतील तर जिल्ह्यातील कायदेविषयक मदत करण्याऱ्या संघटना आणि संबंधित विभागाचे पोलीस ठाणे यांना त्या व्यक्तीच्या अटकेची वेळ, ठिकाण आणि कोठडीची जागा हे ८ ते १२ तासांच्या आत तारेने किंवा दूरध्वनीने कळवले गेले पाहिजे.

५. अटक झालेल्या व्यक्तीला तो/ती अटक झाली आहे, हेही त्या त्या संबंधित मित्रमंडळी, नातेवाईकास ताबडतोबीने कळवण्याचा हक्क आहे. हे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले पाहिजे.

६. ज्या ठिकाणी त्या व्यक्तीस डांबून ठेवले असेल तेथे पोलीस डायरीमध्ये त्या व्यक्तीचे नाव, अटकेचे कारण, जवळपासच्या ज्या व्यक्तीस अटकेबाबत कळविले आहे. त्या व्यक्तीचे नाव आणि इतर तपशील आणि ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या ताब्यात ती व्यक्ती आहे त्याचे नाव व इतर गोष्टी स्पष्टपणे लिहिल्या पाहिजेत.

७. जर अटक झालेल्या व्यक्तीने विनंती केली तर अटकेच्या वेळी त्या व्यक्तींच्या अंगावर काही शुल्लक किंवा गंभीर स्वरूपाच्या जखमा आहेत काय याची तपासणी पोलीस अधिकाऱ्यांनी केली पाहिजे. या तपासणीच्या कागदावर अटक झालेली व्यक्ती आणि संबंधित व्यक्ती यांनी सही केली पाहिजे आणि त्याची प्रत अटक झालेल्या व्यक्तीस दिली पाहिजे.

८. अटक झालेल्या व्यक्तीला ४८ तासांच्या आत प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत वैद्यकीय चाचणी केली गेली पाहिजे, हा वैद्यकीय अधिकारी राज्याच्या आरोग्य संचालनालयाकडून प्रमाणित करण्यात आलेला असावा. आरोग्य संचालनालयाने प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यामध्ये असे प्रमाणित केलेले वैद्यकीय अधिकारी कोण आहेत याची यादी जाहीर करावी.

९. अटकेच्या आदेशासहीत वरील सर्व दस्त ऐवजाच्या प्रती स्थानिक न्याय दंडाधिकाऱ्यांकडे ताबडतोब पाठविण्यात याव्यात.

१०. आरोपींची तपासणी चालू असतांना, त्या दरम्यान आरोपीला त्याच्या वकीलाला भेटण्याचा पूर्ण अधिकार राहील.

११. राज्य आणि जिल्हा स्तरावरील पोलीस मुख्यालयात असणाऱ्या पोलीस नियंत्रण कक्षामध्ये अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने आठ ते बारा तासाच्या आत अटक केलेल्या व्यक्तीचे नाव व इतर तपशील ताबडतोबीने पाठविला पाहिजे. हा तपशील सर्वांना दिसेल अशा ठिकाणी सूचना फलकावर लिहिला पाहिजे.

वरील नियमांचे पालन न झाल्यास सर्वोच्च न्यायालयाचा निर्देशांचा संबंधित अधिकाऱ्यांकडून न्यायालयाच्या अवमानाच्या सबबीखाली कारवाई करण्यात येईल.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई